cmyk

## संपादकीय

### व्यापक भूमिका मांडल्यास जय निश्चित !

मतचोरीच्या विषयावर पुन्हा एकदा जोरकसपणे आवाज उठवण्यासाठी काँग्रेसने दिल्लीत रामलीला मैदानावर एक प्रचंड रॅली आयोजित केली. रॅलीला झालेली गर्दीही मोठी होती आणि त्यात झालेली भाषणे काँग्रेसचा पीळ अजून कायम आहे हे दर्शवणारी होती.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२२९ | बुधवार दि.१७ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# पुणे विभाग ऊस गाळपात आघाडीवर, कोल्हापूरचा साखर उतारा सर्वाधिक!

पुणे । प्रतिनिधी

**कोल्हापूर विभागात ४१ कारखाने असून त्यातील ३५ कारखान्यांनी गाळप हंगाम सुरु केला. त्यात २३ सहकारी १२ खासगी कारखान्यांचा समावेश आहे. या कारखान्यांनी १५ डिसेंबरपर्यंत ८५.०७ लाख टन उसाचे गाळप केले आहे. तर त्यातून ८३.१२ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. तर कोल्हापूर विभागाचा साखर उतारा राज्यात सर्वाधिक ९.७७ टक्के एवढा आहे.**



साखर आयुक्तालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, यंदाच्या २०२५–२६ हंगामात एकूण १८५ कारखान्यांनी गाळप सुरु केले आहे. १५ डिसेंबरपर्यंत त्यांनी ३८१ लाख टन उसाचे गाळप केले आहे. त्यातून त्यांनी ३१९ लाख क्विंटल साखर उत्पादन घेतले आहे. राज्यातील सरासरी साखर उतारा ८.३६ टक्के एवढा आहे. कोल्हापूर पाठोपाठ पुणे विभागाचा उतारा ८.६३ टक्के आहे. पुणे विभागातील ३० कारखान्यांनी गाळप हंगाम सुरु केला आहे. त्यांनी आतापर्यंत सर्वाधिक ९६.५ लाख टन उसाचे गाळप केले आहे. त्यांनी ८३.२९ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. अमरावती विभागाचा उतारा ८.४५ टक्के तर नांदेड विभागाचा उतारा ८.०९ टक्के आहे. तसेच राज्यातील कारखान्यांनी नोव्हेंबरमध्ये गाळप केलेल्या ऊस बिलाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यास सुरुवात केली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील बिद्री (ता. कागल) येथील श्री दूधगंगा वेदगं सहकारी साखर कारखान्याने चालू गळीत हंगामातील १६ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ दरम्यान गाळप झालेल्या उसाची बिले जमा केली आहेत. प्रतिटन ३,६१४ रुपयांप्रमाणे बिलाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केली आहे, अशी माहिती कारखान्याचे उपाध्यक्ष मनोज फराकटे यांनी दिली आहे. नोव्हेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात कारखान्याने १ लाख ३० हजार ६३२ मेट्रिक ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### पंजाबमध्ये कबड्डीपटूची गोळ्या घालून हत्या

मोहाली : पंजाबमधील मोहाली येथील सोहाना परिसरात सोमवारी रात्री एका खासगी कबड्डी स्पर्धेदरम्यान मोटारसायकलवरून आलेल्या दोन ते तीन अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला. कबड्डीपटू आणि प्रमोटर राणा बालचौरिया याच्या चेह–यावर आणि शरीराच्या वरच्या भागात चार ते पाच गोळ्या लागल्या. त्याला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, पण अखेर त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले.मोहालीचे पोलिस अधीक्षक हरमनदीप हंस यांच्या म्हणण्यानुसार, हल्लेखोर सेल्फी काढण्याच्या बहाण्याने त्याच्याकडे गेले. राणा बालचौरिया थांबताच हल्लेखोरांनी अचानक गोळीबार केला.

### यमुना एक्स्प्रेस वेवर भीषण अपघात; १३ ठार

मथुरा : उत्तर प्रदेशातील मथुरा येथे आज १६ डिसेंबर रोजी पहाटे यमुना एक्स्प्रेस वेवर झालेल्या भीषण अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला असून २५ हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. दाट धुक्यामुळे हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती असून, आग्रा ते नोएडा दिशेने जाणा–या ८ बस आणि ३ कार एकमेकांवर आदळल्या. धडक इतकी जोरदार होती की, काही वाहनांना भीषण आग लागली.हा अपघात आग्रा–नोएडा मार्गावर बलदेव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खडेहरा गावाजवळ, माईलस्टोन क्रमांक १२७ जवळ घडला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलिसतात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

### समृद्धी महामार्गावर कार उलटली; ३ ठार

नाशिक : समृद्धी महामार्गावर भयंकर अपघाताची घटना घडली आहे. भरधाव कारचे टायर फुटल्याने एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला तर अनेक जण गंभीर जखमी झाले. ही घटना नाशिकच्या सिन्नर तालुक्यातील पाटोळे येथे समृद्धी महामार्गावर घडली. अपघातामध्ये जखमी झालेल्यांमध्ये अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे. जखमींमध्ये लहान मुलांचा देखील समावेश आहे. अपघातातील मृत आणि जखमी हे कल्याणमध्ये राहणारे आहेत. अपघातापूर्वीचा त्यांचा व्हीडीओ समोर आला आहे. कल्याण पूर्वेच्या चिंचपाडा येथे राहणारे ११ जण कारने लग्नासाठी गेले होते.

### पुण्यात पोलिसने थांबवले इंदुरीकराजांचे कीर्तन

पुणे : मुलीच्या साखरपुडा कार्यक्रमात केलेल्या खर्चावरून टीकेचे धनी बनलेले प्रसिद्ध कीर्तनकार इंदुरीकर महाराज पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. आणि त्याला कारणीभूत ठरले आहे ते त्यांचे पुण्यातील कीर्तन.. पुण्यातील हडपसर परिसरात महाराजांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होता. मात्र आयोजकांनी यासाठी रस्ताच अडवल्याने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे हडपसर परिसरात भली मोठी वाहतूक कोंडी झाली. त्यामुळे संतप्त झालेल्या सहायक पोलिस निरीक्षक प्रविण जाधव यांनी अखेर त्यांना कार्यक्रम थांबवण्यास सांगितले. याचा एक व्हीडीओ सध्या समोर आला आहे.

### पिंपरीत भाजप विरोधात सर्वपक्षीय एकवटणार

पुणे : मुंबईत काँग्रेस आणि मनसेचे सुत जुळत नसले तरी पिंपरी चिंचवडमध्ये मात्र काँग्रेस आणि मनसेने सोबत येण्याचा निर्णय घेतला आहे. पिंपरी–चिंचवडमध्ये महाविकास आघाडीची बैठक घेण्यात आली, यात मनसेचे नेतेही सहभागी झाले होते. शिवाय महादेव जानकरांच्या रासपचेही नेते उपस्थित होते. विशेष म्हणजे अजित पवारांची राष्ट्रवादी आमच्या आघाडीत आली तरी आमची हरकत नाही, असं म्हणत या सर्व पक्षीयांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीलाही मविआत येण्याचं आमंत्रण धाडलं आहे. एकंदरीत पिंपरीत भाजपच्या विरोधात सर्वपक्षीयांनी मोट बांधण्याची तयारी सुरू केल्याचं चित्र आहे.

# मंत्री माणिकराव कोकाटे यांची कारावासाची शिक्षा कायम

नाशिक । प्रतिनिधी

**राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या मागे लागलेलं शुक्लकाष्ट काही केल्या संपताना दिसत नाही. विविध वादग्रस्त विधानांमुळे त्यांची कृषीमंत्री पदावरुन उचलबांगडी करण्यात आली होती. तसेच शासकीय कोट्यातील १० टक्के सदनिका गैरव्यवहार प्रकरणी प्रथम वर्ग न्यायालयाने त्यांना २ वर्षे कारावास आणि १० हजार दंडाची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेविरोधात माणिकराव कोकाटे यांनी जिल्हा सत्र न्यायालयात धाव घेतली होतीमात्र त्यांची शिक्षा कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याने त्यांच्यावर अटकेची टांगती तलवार कायम आहे .**

जिल्हा सत्र न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांना प्रथम वर्ग न्यायालयाने दिलेली शिक्षा कायम ठेवली आहे. जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश पी एम बदर यांनी कोकाटे यांना शिक्षा सुनावली आहे. जिल्हा सत्र न्यायालयाने २ वर्षे कारावास आणि १० हजार दंडाची शिक्षा कायम ठेवली आहे. त्यामुळे मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर आता अटकेची



टांगती तलवार आहे. तसेच या शिक्षेमुळे माणिकराव कोकाटे यांचं मंत्रिपदही धोक्यात आलं आहे. या प्रकरणी जामिनासाठी आता माणिकराव कोकाटे यांना उच्च न्यायालयात धाव घ्यावी लागणार आहे.माणिकराव कोकाटे यांनी नाशिकच्या उच्चभ्रू परिसरात अल्प उत्पन्न गाटतून सदनिका मिळवल्याचा आरोप आहे. हे प्रकरण ३० वर्षांच्या पूर्वीचं आहे. त्यांनी चार जणांना कॅनडा कॉर्नर भागात निर्माण व्हू अपार्टमेंटमध्ये मुख्यमंत्री कोट्यातून अल्प उत्प गटातून सदनिका मिळवून दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी तेव्हाचे दिवंगत राज्यमंत्री तुकाराम दिघोळे यांनी तक्रार केली होती. या प्रकरणी ▶▶ पान २ वर

# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजना पूर्णपणे डिजिटल

## महाडीबीटीवरून थेट मदत मिळणार



पुणे । प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना आता पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आली आहे. या योजनेत अर्ज करणे, कागदपत्रांची तपासणी आणि अनुदान मंजुरी ही सर्व प्रक्रिया महाडीबीटी पोर्टलवरून होणार आहे. त्यामुळे अपघातग्रस्त शेतकरी किंवा त्यांच्या कुटुंबीयांना घरबसल्या अर्ज करता येईल आणि मंजूर रक्कम थेट बँक खात्यात जमा होईल. शेतीकाम करताना अपघातामुळे मृत्यू किंवा कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास मदत मिळण्यात होणारा विलंब या निर्णयामुळे कमी होणार आहे.

ही योजना शेतीशी संबंधित काम करताना अपघातात मृत्यू किंवा कायमस्वरूपी अपंगत्व आलेल्या शेतकऱ्यांसाठी आर्थिक संरक्षण देते. अपघातात शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबाला २ लाख रुपये, तर कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास १ लाख रुपये मदत दिली जाते. याआधी ऑफलाइन पद्धतीमुळे प्रक्रियेला वेळ लागत होता, मात्र आता डिजिटल प्रणालीमुळे मदत लवकर मिळण्याची शक्यता आहे. या योजनेअंतर्गत शेतीत काम करताना होणारे अपघात, पाण्यात बुडणे, सर्पदंश व विंचूदंश, विजेचा धक्का किंवा वीज पडणे, पूर–वादळासारख्या नैसर्गिक आपत्ती, तसेच रस्ते अपघात किंवा जंतुनाशकांची विषबाधा अशा विविध घटनांचा समावेश आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामातील अनेक जोखमींपासून संरक्षण मिळणार आहे. राज्य शासनाने हा बदल करून शेतकरी कुटुंबांना अधिक सुरक्षित आणि सक्षम करण्याचा प्रयत्न केला आहे. वरील सर्व घटकांसाठी हि योजना लागू होते, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या दैनंदिन संकटाना संरक्षण मिळते. राज्य शासनाने हा बदल करून शेतकरी कुटुंबांना अधिक सक्षम बनवले आहे. जर शेतकरी अशा अपघाताला बळी पडला असेल, तर कुटुंबीयांनी महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करून लाभ घ्यावा, असे शासनातर्फे सांगण्यात आलं आहे.

**ऑफलाईन नोंदणी बंद**

# मविआचे खासदार गृहमंत्र्यांच्या भेटीला

## मनोज जरांगे दिल्लीत;शौर्य प्रकरणात एसआयटी

नवीदिल्ली । प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांनी दिल्लीत शाळकरी मृत शौर्य पाटील या विद्यार्थ्याच्या कुटुंबाची भेट घेतली. या प्रकरणात केंद्र सरकारने तात्काळ कारवाई करावी, दोषी शिक्षकांवर कारवाई करावी, तसेच संबंधित शाळेची मान्यता रद्द करावी अशी मागणी केली आहे. येथील पत्रकार परिषदेत जरांगे पाटील यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना सवाल केले आहेत. दरम्यान, दुसरीकडे



महाराष्ट्रातील खासदारांनी अमित शाह यांची भेट घेत शौर्य पाटील मृत्यूप्रकरणात चौकशीची मागणी केली. त्यावेळी, अमित शाह यांनी शौर्य पाटील आत्महत्या प्रकरणी एसआयटी नेमण्याचं ▶▶ पान २ वर

# काँग्रेस आणि 'वंचित'ची आघाडी होण्याची शक्यता

मुंबई । प्रतिनिधी

**महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी पक्षाची आघाडी होण्याची दाट शक्यता आहे. मुंबई वगळता इतर सर्व २८ महापालिकांच्या निवडणुकीत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी एकत्र निवडणूक लढण्याच्या तयारीत आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काल वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची मुंबईत येऊन भेट घेतली. या भेटीत एकत्र महापालिका निवडणुका लढण्याबाबत निर्णय झाला. काँग्रेसचा वंचितसोबत जागावाटपाचा लवकरच फॉर्म्युला ठरणार आहे.**



महापालिका निवडणुका जाहीर झाल्यानंतर प्रत्येक पक्षाच्या गोटात हालचालींना वेग आला आहे. प्रत्येक पक्षात अतिशय वेगवान घडामोडी सुरु आहेत. बैठका घेतल्या जात आहेत. उमेदवारांना अर्जांचं वाटप केलं जात आहे. काही ठिकाणी इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या जात आहेत. या निवडणुकीत कुणासोबत युती आणि आघाडी करायची? याबाबतही नेतेमंडळींची चर्चा सुरु आहे. अशीच ▶▶ पान २ वर

# मनरेगा चे नाव बदलल्यास काँग्रेस उतरणार रस्त्यावर

मुंबई । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षापासून रोजगार हमी योजना या गोरगरिबांच्या आणि कष्टकऱ्यांच्या योजनेला महात्मा गांधी यांचे नाव होते मात्र आता केंद्र सरकारने या योजनेतील महात्मा गांधी यांचे नाव बदलून नवीन नाव देण्याच्या हालचाली सुरू केल्याने या विरोधामध्ये काँग्रेस रस्त्यावर उतरण्याची तयारी करत आहे.

महात्मा गांधी रोजगार हमी योजना या मनरेगा असे नाव असलेल्या योजनेचे नाव आता भाजप सरकार बदलण्याच्या तयारीत ▶▶ पान २ वर

# गेवराई राडा; भाजपचे बाळराजे पवारांसह ५ जणांना अटक

बीड– गेवराई । प्रतिनिधी

गेवराई नगर परिषद निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी मंगळवार दि. २ डिसेंबर रोजी भाजप आणि राष्ट्रवादी(अजित पवार गट) समर्थकांमध्ये झालेल्या राजकीय राड्याप्रकरणी पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. या राड्यात थेट माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या कृष्णाई निवासस्थानात घुसून त्यांच्या स्वीय सहायक अमृत डावकर यांना मारहाण केल्याच्या आरोपाखाली ▶▶ पान २ वर

### एका दिवसाची पोलिस कोठडी

बाळराजे पवार यांच्यासह अरुण पवार, महेश खंडागळे, अमर मिसाळ आणि नोमान फारुकी यांच्याविरोधात कलम ३३३ (सरकारी कर्मचा–याला कर्तव्यापासून परावृत्त करण्यासाठी दुखापत करणे) आणि ११८ (१) (सार्वजनिक शांतता भंग करणे) ही गंभीर कलमे वाढवली.त्यांना मंगळवारी सकाळी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने एका दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे.

# ओबीसींवर टांगती तलवार-वडेट्टीवार

मुंबई । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसींना २७ टक्के आरक्षण दिले असे भाजप सांगत होती. आता महापालिकेच्या निवडणुका घोषित झाल्या आहेत. पण उद्या कोर्टात जाऊन पुन्हा ओबीसींच्या जागांवरील निवडणुका रद्द झाल्या, त्यांचे प्रतिनिधित्व कमी झाले तर ही जबाबदारी कुणाची? निवडणुका झाल्या तरी ओबीसींवर टांगती तलवार आहे. त्यांच्या जागांवर वरवंटा फिरणार आहे, अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय ▶▶ पान २ वर

# राजधानीत नो पीयूसी नो पेट्रोल

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**राजधानी दिल्लीमधील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील भाजप सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. दिल्लीचे पर्यावरण मंत्री मनजिंदर सिंह सिरसा यांनी जाहीर केले की, येत्या गुरुवार दि. १८ डिसेंबरपासून प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र नसलेल्या कोणत्याही वाहनाला पेट्रोल पंपावर देण्यात येणार नाही. याशिवाय, पीयूसीसी नसल्यास ७ लाख रुपयांपेक्षा जास्त दंड (चलान)देखील आकारला जाईल.**

मनजिंदर सिंह सिरसा पुढे म्हणाले, दिल्लीत बीएस–६ पेक्षा कमी असलेल्या सर्व डिझेल वाहनांच्या प्रवेशावर पूर्णपणे



बंदी असेल. बाहेरील नोंदणी असलेल्या खाजगी वाहनांना दिल्लीत प्रवेश दिला जाणार नाही. फक्त दिल्ली नोंदणी असलेल्या वाहनांनाच परवानगी असेल. बांधकाम साहित्य वाहून नेणा–या ट्रकनादेखील मोठा दंड आकारला जाईल आणि त्यांची वाहने जप्त केली जातील असा इशाराही त्यांनी दिला. सरकारने प्रदूषण नियंत्रणासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती देताना मंत्री सिरसा म्हणाले की, दिल्लीतील प्रदूषणाची पातळी सध्या 'फेअर स्टेज' मध्ये आहे. गेल्या १० वर्षांपासून हीच स्थिती आहे.मागील वर्षी एक्यूआय ३८० होता, सध्या ३६३ आहे. दिल्लीतील कच–याचे डोंगर १५ मीटरने कमी करण्यात आले आहेत. २०२ एकरांपैकी ४५ एकर क्षेत्र साफ करण्यात आले आहे. दिल्लीतील औद्योगिक भागांवर नियंत्रण ठेवण्यासाठी, डीपीसीसीकडून २,००० ▶▶ पान २ वर

# माजी आ.धोंडे यांच्या महेश साखर कारखान्याला न्याय मिळाला

आष्टी । प्रतिनिधी



आष्टी विधानसभा मतदार संघात कामधेनु असलेल्या महेश (कडा) सहकारी साखर कारखान्याचे लायसन्स तांत्रिक कारणाने रद्द करण्यात आले होते. हे लायसन केंद्र शासनाने पूर्ववत केले आहे. हजारो ऊस उत्पादक शेतकरी,सभासद असलेला महेश सहकारी साखर कारखाना हा अनेक वर्ष दुष्काळी परिस्थितीमुळे व पाण्याच्या टंचाईमुळे अनेक वर्ष बंद पडल्याने, राजकीय हस्तक्षेप वाढल्याने अडगळीत पडल्याने शेतकरी,कामगार, सभासद यांचे प्रचंड नुकसान झाले.

आज या मतदार संघात उजनी व इतर धरणातील अनेक ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१६ डिसेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ६८.५० क्विंटल | २,३०१ | ३,१०० | २,६१२ |
| ज्वारी/हायब्रिड : ९.५० क्विंटल | २,४०० | ३,०११ | २,७३४ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ६.५० क्विंटल | ६,०५० | ६,५०० | ६,२१६ |
| उडीद :१.५० क्विंटल | ४,४०१ | ४,४०१ | ४,४०१ |
| बाजरी: ३८.५० क्विंटल | २,५९१ | ३,०५१ | २,९१३ |
| मुग: ०.५० क्विंटल | ७,५०१ | ७,५०१ | ७,५०१ |
| सोयाबीन: १९१.०० क्विंटल | ४,३५० | ४,५०० | ४,४१९ |
| हरभरा: १७.५० क्विंटल | ४,६०० | ५,२०० | ४,९०० |

cmyk

## अग्रलेख

# व्यापक भूमिका मांडल्यास जय निश्चित !

मतचोरीच्या विषयावर पुन्हा एकदा जोरकसपणे आवाज उठवण्यासाठी काँग्रेसने दिल्लीत रामलीला मैदानावर एक प्रचंड रॅली आयोजित केली. रॅलीला झालेली गर्दीही मोठी होती आणि त्यात झालेली भाषणे काँग्रेसचा पीळ अजून कायम आहे हे दर्शवणारी होती. नुकत्याच झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्ष आणि इंडिया आघाडी यांचा जो दारूण पराभव झाला त्यातून काँग्रेस नामोहरम झाली असेल, असे भासले होते. गेले काही दिवस काँग्रेसच्या वाट्याला सातत्याने पराभवामागून पराभव येत आहेत, नुसतेच निसटते पराभव नव्हे तर एकतर्फी दारुण पराभव म्हणावा इतकी भीषण स्थिती काँग्रेसवर अलीकडच्या काळात ओढवली आहे.

बिहारच्या निवडणुकीने तर काँग्रेसचे अवसानच गळून पडेल असे वाटले होते. पण ते तसे बिलकुल नाही हे स्पष्टपणे दर्शवण्याचे काम काँग्रेसच्या दिल्लीतील रॅलीने केले आहे. मराठीत एक फार जुनी म्हण आहे सुंभ जळाला तरी पीळ कायम राहतो. दिल्लीतील मोठ्या रॅलीने काँग्रेसने आपला पीळ कायम असल्याचे दाखवले आहे. काँग्रेसचा हा धीर किंवा अवसान पाहून भाजपच्या धुरिणांना बुचकळ्यात पडल्यासारखे झाले असावे. राहुल गांधींचा नेमका गेम काय आहे हेच त्याला कळेनासे झाले असावे. देशातील विविध वाहिन्यांवर याच अनुषंगाने चर्चा पण झाल्या, त्याचा सूरही हाच होता. दिल्लीच्या रॅलीत विविध नेत्यांची जी भाषणे झाली त्यातील भाषा आव्हानात्मक होती.

खुद्द राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांची भाषणेही अत्यंत आव्हानात्मक होते. या दोन्ही नेत्यांनी निवडणूक आयोगावर जोरदार हल्ला चढवताना तेथे कार्यरत असलेल्या तीनही निवडणूक आयुक्तांची नावे उच्चारली आणि ही नावे लक्षात ठेवा, असे आवाहन त्यांनी उपस्थिताना केले. प्रियांका गांधी यांनी तर या तीनही आयुक्तांची नावे उच्चारून लोकांकडून ती वदवून घेतली आणि ही तीन नावे कायम लक्षात ठेवा, असे म्हटले. संबंधितांना धडकी भरावी असाच हा हेतू असावा. काँग्रेसच्या कालच्या रॅलीत त्यामुळेच मोठा दम असल्याचे दिसून आले. जनमताचा कौल सातत्याने विरोधात जात असताना आणि सरकार किंवा निवडणूक आयोग आपले सारे प्रयोग पुन्हा त्याच पद्धतीने राबवत असतानासुद्धा काँग्रेसपण तसूभरही मागे हटायला तयार नाही, हे जनमानसावर बिंबवण्याचे काम कालच्या रॅलीने केले. त्याचा काँग्रेसला किती फायदा होईल किंवा निवडणूक आयोगाच्या कामकाज पद्धतीवर त्याचा नेमका काय परिणाम होईल हे इतक्यात सांगता येणार नसले, तरी काँग्रेसने आपला दम अजूनही कायम असल्याचे या निमित्ताने दाखवून दिले. त्यामुळे ही लढाई अजून संपलेली नाही, हा स्पष्ट संदेश यातून गेला आहे. अत्यंत विपरीत परिस्थितीत दिल्लीतल्या रामलीला मैदानासारख्या मोठ्या मैदानावर सभा आयोजित करणे आणि त्याला मोठी गर्दी जमवणे हे सोपे काम नव्हते. या रॅलीसाठी बाहेरील राज्यातून गर्दी बोलवण्यात आली असली, तरी लोक ती गर्दी करायला तयार झाले यातूनही एक वेगळा संदेश जातो आहे. अर्थात, हे सगळे जरी खरे असले तरी देशात जर मतचोरीचे प्रकार होत असतील तर ती काही एकट्या काँग्रेसची समस्या नाही. देशाच्या सगळ्याच विरोधी पक्षांना त्याला तोंड द्यावे लागत आहे. सध्या बारा राज्यांत पुन्हा एसआयआरचा प्रयोग सुरू आहे. तेथेही समाजवादी पार्टी, तृणमूल काँग्रेस, कम्युनिस्ट पार्टी अशा इंडिया आघाडीतील अन्य पक्षांना मोठे आव्हान निर्माण झाले आहे. त्यामुळे मतचोरीच्या मुद्द्यावर एकटी काँग्रेसच लढते आहे असे जे चित्र निर्माण झाले आहे ते एव्हाना दूर व्हायला हवे होते. बाकीच्या राजकीय पक्षांनीसुद्धा याबाबतीत संघटितपणे आवाज उठवायला हवा, पण विरोधकांना या मुद्द्यावर संघटित करायला काँग्रेस अजूनही कमी पडते आहे. किंबहुना काँग्रेस तसा प्रयत्न करताना दिसत नाही. या मतचोरीच्या मुद्द्यावर जर देशव्यापी व्यापक जनआंदोलन उभारायचे असेल, तर बाकीच्या पक्षांना बरोबर घेणे काँग्रेसला महत्त्वाचे आहे. हा प्रयत्न काँग्रेसकडून का होत नाही हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. समोर भाजपसारखे अति शक्तिशाली आव्हान आहे, हे आव्हान समर्थपणे एकट्याच्या जीवावर पैलणे निदान आज तरी काँग्रेसला शक्य आहे असे दिसत नाही. इंदिरा गांधींसारख्या बलाढ्य राजवटीच्या विरोधात जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली मोठे जनआंदोलन उभे राहिले होते. त्या आंदोलनात तत्कालीन जन संघ, कम्युनिस्ट या काही परस्पर विरोधी विचारधारांचे पक्ष एकत्र घेऊन जे एकसंध आंदोलन चालवले गेले त्यातून देशात मोठी क्रांती झाली आणि खुद्द इंदिरा गांधींसह त्यांचे सरकार पराभूत झाले. भाजपच्या विरोधात काँग्रेसला जर अशी क्रांती करायची असेल तर अशाच एखाद्या विशाल जनआंदोलनाची गरज आहे. त्यासाठी काँग्रेसने पुढाकार घेतला पाहिजे. काँग्रेसला ते जमेल का या प्रश्नाच्या उत्तरावर त्यांचे भवितव्य अवलंबून आहे. त्या दृष्टीने काँग्रेसने आता प्रयत्न केले पाहिजेत. विरोधी पक्षांचे नेतृत्व केवळ आपल्याकडेच असावे ही काँग्रेसची राजकीय इच्छा आहे हे खरे असले, तरी आपले नेतृत्व इंडिया आघाडीतील अन्य पक्षांच्या गळी उतरवण्यासाठी काँग्रेस किती प्रयत्नशील राहील आणि त्यात त्यांना अन्य पक्षांची किती साथ मिळेल यावरही बरेच काही अवलंबून आहे.

---

# उच्च पदावर कार्यरत असलेले विद्यार्थी हेच शाळेचे यश

### कपिल आकात शास्त्री विद्यालयात सेवागौरव समारंभ

**जालना । प्रतिनिधी**

**लालबहादूर शास्त्री विद्यालयात शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत हेच शाळेचे खरे यश असून संस्थेलाही या यशाचा सार्थ अभिमान वाटतो असे प्रतिपादन मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव कपिल आकात यांनी केले. शहरातील लालबहादूर शास्त्री विद्यालयात मंगळवारी (दि. २६) आयोजित सेवागौरव कार्यक्रमात अध्यक्ष पदावरून ते बोलत होते. यावेळी सेवानिवृत्त उपमुख्याध्यापक राजकुमार ठोकरे, सहशिक्षक हरिओम कोरके, आसाराम धुमाळ, मधुकर वखरे, मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांची उपस्थिती होती.**



आकात पुढे म्हणाले की,चांगल्या शिक्षकांमुळे शाळेचा तसेच संस्थेचा निश्चितच नावलौकिक होतो. लालबहादूर शास्त्री शाळेचे अनेक माजी विद्यार्थी आज वैद्यकीय, अभियांत्रिकी, शिक्षण, विधी, या क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत.काही विद्यार्थ्यांनी कला, क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविले आहे तर काही जण नाटक आणि चित्रपट सृष्टीत चांगले काम करत आहेत. चांगल्या शिक्षकांमुळे संस्थेचा तसेच शाळेचा नावलौकिक होतो याचा सार्थ अभिमान वाटतो असेही आकात शेवटी म्हणाले. यावेळी सेवानिवृत्त झालेल्या चारही कर्मचाऱ्यांचा कपिल आकात, मुख्याध्यापक बिरादार व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार व भेटवस्तू देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी बाबुराव काटे,नामदेव धुमाळ,माजी मुख्याध्यापक अंकुश मोरे,पी. आर. निर्वळ, पर्यवेक्षक अनिल सोनपावले, मुख्याध्यापक पी.बी. निर्वळ,प्राचार्य उद्धव बागल,प्रा. डॉ.राम खालापुरे, डॉ. श्वेता धुमाळ, प्रा. जयदीप कदम,योगेश बागल,शरद पाटील,बालासाहेब राऊत, विश्वनाथ वखरे, नेहा वखरे,भागवत काकडे, वैभव पाटील,पर्यवेक्षक राजकुमार राऊत, त्र्यंबक घुगे,यांच्यासह विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.सुत्रसंचालन श्रीमती चंदा लड्डा यांनी केले.

---

# शिलाई मशिनचे आमिष दाखवून ४२४ महिलांची फसवणूक

**मुंबई । प्रतिनिधी**

**सरकारी योजनेतून शिलाई मशिन देण्यात येणार असल्याचे सांगून तालुक्यातील ४२४ महिलांकडून प्रत्येकी ६०० ते १७०० रुपये प्रमाणे एकूण ३ लाख ६५ हजार ९७० रुपये उकळण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.पैसे घेऊनही अनेक महिने उलटून गेले तरी शिलाई मशिन न मिळाल्याने संतप्त महिलांनी सोमवारी चिपळूण पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.**

या प्रकरणी सुभाष सकपाळ (रा. देवघर, ता. गुहागर) या व्यक्तीला पोलिसांनीनीषा संतोष खेडेकर, श्रेया शंकर पाटेकर, रुचिता रणजित कदम, स्वरा स्वप्निल घारे, रिया राजेंद्र देवळेकर यांच्यासह अनेक महिलांनी पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार, सुभाष सकपाळ याने चिपळूण तालुक्यातील महिलांना सरकारी योजनेखाली शिलाई मशिन मिळेल, असे सांगून नोंदणी व प्रक्रिया शुल्काच्या नावाखाली पैसे घेतले. वीस ते पंचवीस दिवसांत मशिन मिळेल, असे आश्वासनही देण्यात आले. मात्र, कालावधी उलटून गेला तरी कोणत्याही महिलेला शिलाई मशिन देण्यात आली नाही. याबाबत विचारणा केल्यावर सकपाळ याच्याकडून टाळाटाळीची उत्तरे दिली जात होती, असा आरोप महिलांनी केला आहे.विशेष म्हणजे, या प्रकरणातील बहुतांश महिला सर्वसामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील आहेत. दरम्यान, या प्रकरणात फसवणुकीचा गुन्हा दाखल होण्याची शक्यता असून संबंधित सरकारी योजना नेमकी कोणती होती, जमा केलेली रक्कम कुठे वापरण्यात आली आणि या प्रकारात आणखी कोणी सहभागी आहे का, याबाबत पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

---

# राष्ट्रीय महामार्गावर कंटेनर-ट्रक अपघातात एक ठार,दोन जखमी



**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई शहरा पासून दोन किलोमीटर अंतरावर इसार पंपाजवळ बाह्यवळण रस्त्यावर उड्डाण पुलाचे काम चालु असलेल्या ठिकाणी दोन कंटेनरची समोरासमोर धडक होवुन झालेल्या अपघातात एक जण ठार तर दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना मंगळवार रोजी दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास घडली.**

गेवराई पासून दोन किलोमीटर अंतरावर हिसार पंपाजवळ ट्रक आणि कंटेनर ची समोरासमोर धडक होऊन इमाम घासिखान पठाण वय ४० राहणार वडवळ तालुका चाकुर जिल्हा लातूर असे ठार झालेल्याचे नावं असुन जावेद गुलाब चौधरी वय ३० व फरमान जावेद पाशा वय २३ दोघे राहणार उत्तर प्रदेश असे जखमीचे नांवे असुन अपघातातील एक कंटेनर बीडहुन छत्रपती संभाजी नगर कडे जात होता तर दुसरा कंटेनर छत्रपती संभाजी नगर हुन बीड च्या दिशेने येत असतांना दोन्ही कंटेनरची शहरा बाहेरून जाणा-या बाह्यवळण चौका जवळ उड्डाण पुलाचे काम चालु असलेल्या ठिकाणी समोरासमोर जोराची धडक होवुन एक ठार दोन जखमी झाले.या अपघातात दोन्ही गाड्याचा समोरील भाग चक्काचुर झाला आहे.जखमीला येथील उपजिल्हा रुग्णालय उपचार करून पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजी नगर येथे पाठवले आहे. या अपघातामुळे तब्बल चार तास वाहतूक विस्कळीत झाली होती.या प्रकरणी उशिरा पर्यंत गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता.

---

# वेड्याच्या त्रासाला आष्टी शहर कंटाळले

### वर्ष झाले तरी या तरुणाचा बंदोबस्त होत नाही

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी शहरामध्ये गेल्या काही दिवसांपासून एक वेडसर तरुण फिरत असून हा महिलांनाही त्रास देतो. सहा महिन्यापूर्वी त्याने एका मंदिराची दानपेटीही फोडली होती. मात्र वेडा समजून त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. या वेडसर तरुणांकडून मोठा अनर्थ घडू शकतो. या तरुणाचा त्वरित बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.**

गेल्या सहा महिन्यापासून हा तरूण आष्टी शहरामध्ये फिरत असून त्याने वृद्ध आणि महिलांवरही यापूर्वी हल्ले केलेले आहेत. शुक्रवारी किनारा चौकामध्ये मुलींच्या शाळेत महिला शिपायावर हल्ला करून जखमी केले. सुदैवाने त्या बचावल्या. या प्रकरणात पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर ते नगरपंचायतचे काम असल्याचे सांगतात. या संदर्भात आमदार सुरेश धस यांनी नगरपंचायत चे अध्यक्ष बेग यांना सांगितल्यानंतर त्यांनी या संदर्भात कारवाई सुरू असल्याचे सांगितले. या वेडसर मुलाने काही दिवसापूर्वी शनी मंदिरातील दानपेटी फोडली होती. या वेडसर तरुणाचा त्वरित बंदोबस्त करून त्याला येरवडा रुग्णालय पाठवावे अशी मागणी शहरातील नागरिकातून होत आहे.

---

# डॉ.लक्ष्मण उलगडे लिखित 'माझे गुरु: सर्वांचे गुरु श्री १०८ शिवानंद शिवाचार्य तमलुरेश्वर' महाग्रंथ नोव्हेंबर २०२६ मध्ये प्रकाशित होणार

**बीड । प्रतिनिधी**

**समस्त भाविक भक्तांसाठी अत्यंत आनंदाची व अभिमानाची बाब म्हणजे आदरणीय गुरुवर्य ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महास्वामी तमलुरेश्वर यांच्या दिव्य जीवनकार्यावर आधारित भव्य व सखोल असा महाग्रंथ नोव्हेंबर २०२६ मध्ये प्रकाशित होणार आहे. या महाग्रंथाचे लेखन प्रा. डॉ. लक्ष्मण काशीनाथ उलगडे करत असून, हा ग्रंथ गुरुभक्तांसाठी ज्ञान, प्रेरणा आणि भक्तीचा अमूल्य ठेवा ठरणार आहे.**



यापूर्वी फेब्रुवारी २०२१ मध्ये तमलूर येथे राष्ट्रसंत व वसुंधरारत्न डॉ. शिवलिंग शिवाचार्य माऊली यांच्या शुभहस्ते 'श्रीगुरु दर्शन तमलुरेश्वर : ष. ब्र. १०८ शिवानंद शिवाचार्य महास्वामी' या पहिल्या ग्रंथाचे भव्य प्रकाशन झाले होते. या ग्रंथाचे संपादन श्री माधव काशिनाथ उलगडे व प्रा. डॉ. लक्ष्मण काशीनाथ उलगडे या दोन्ही बंधूंनी केले होते. या ग्रंथास भाविक, अभ्यासक व समाजातील विविध स्तरांतून मोठा प्रतिसाद मिळाला. या यशस्वी ग्रंथानंतर आता प्रा. डॉ. लक्ष्मण उलगडे यांनी दुसऱ्या, अधिक व्यापक आणि सखोल स्वरूपाच्या महाग्रंथाचे लेखन हाती घेतले आहे. सुमारे ५५१ पानांचा हा ग्रंथ 'माझे गुरु सर्वांचे गुरु : ष.ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महास्वामी तमलुरेश्वर' या नावाने प्रकाशित होणार आहे. हा ग्रंथ कार्तिक पौर्णिमा २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा असून, त्यानंतर नोव्हेंबर २०२६ मध्ये प्रकाशन केले जाणार आहे. या महाग्रंथामध्ये गुरुमाऊलींचा जीवनप्रवास, अध्यात्मिक साधना, सामाजिक व धार्मिक कार्य, शैक्षणिक योगदान, शिष्यपरंपरा, विविध ऐतिहासिक संदर्भ, दुर्मिळ छायाचित्रे तसेच अनेक भक्तांचे अनुभव व मनोगत समाविष्ट करण्यात येणार आहेत. त्यामुळे हा ग्रंथ केवळ चरित्र नसून एक प्रेरणादायी आध्यात्मिक दस्तऐवज ठरणार आहे. गुरुमाऊलींचा ज्ञानप्रसाद भाविकांना महाग्रंथाच्या रूपाने मिळणार असल्याने या ग्रंथाकडे मोठ्या उत्सुकतेने पाहिले जात आहे. दरम्यान, श्री गुरुमाऊलींविषयी मनोगत, अनुभव तसेच महाग्रंथासाठी शुभेच्छा संदेश देऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी हे संदेश दिनांक १ मार्च २०२६ पर्यंत महाग्रंथाचे लेखक डॉ. लक्ष्मण उलगडे यांच्याकडे व्हॉट्सअॅप क्रमांक ९७६५६३०५९१ वर पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अधिक माहितीसाठी संपर्क

श्री प्रभय्या स्वामी, शिवा बन्नालिकर, आकाश गुडपळे, तेजेराव टेकमाळे, शिवलिंगअप्पा तोरणे, बाबूराव शेटकार, संगय्या महाराज. हा महाग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर महाराष्ट्रासह देशभरातील गुरुभक्तांसाठी तो श्रद्धा, साधना व संस्कृतीचा अमूल्य ठेवा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

---

## पान १ वरून...

### पुणे विभाग ऊस गाळपात आघाडीवर,

टन उसाचे गाळप केले. या उसाची संपूर्ण देय रक्कम शेतकऱ्यांना देण्यात आली आहे. तसेच १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर दरम्यान कालावधीतील तोडणी आणि वाहतूक बिलेही अदा करण्यात येत असल्याचे फराकटे यांनी म्हटले आहे.

-----------

### मंत्री माणिकराव कोकाटे यांची

जिल्हा प्रशासनाने सदनिका वाटपाची चौकशी केली होती. त्यानंतर प्रथमवर्ग न्यायालयाने त्यांना आणि त्यांच्या भावाला २ वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली होती.कोकाटेंसाठी हा खूप मोठा धक्का आहे. आता कोकाटे यांना अटक होते का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

-------------

### काँग्रेस आणि 'वंचित'ची

चर्चा काँग्रेसचे हर्षवर्धन सपकाळ आणि वंचितचे प्रकाश आंबेडकर यांच्यात झाली. या बैठकीत आघाडीचा निर्णय झाल्याचं वृत्त 'एबीपी माझा'ने दिलं आहे.काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीने एकत्र यावेत यासाठी अनेक नेत्यांकडून पडद्यामागे प्रयत्न करण्यात आल्याची चर्चा आहे. अखेर या प्रयत्नांना यश मिळताना दिसत आहे. मुंबईत दोन्ही पक्ष एकत्र लढणार नसले तरी उर्वरित ठिकाणी दोन्ही पक्षांची आघाडी होणार असल्याची माहिती आहे. यासाठी जागावाटपाची पहिल्या टप्प्यातील बैठक काल पार पडली आहे. आगामी काळात याबाबत महत्त्वाचे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे.दरम्यान, काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे. विरोधकांमधला हा महत्त्वाचा पक्ष आहे. पण राज्यात वंचित बहुजन आघाडीची देखील ताकद आहे. तळागळापर्यंत हा पक्ष पोहोचलेला आहे. मतांचं विभाजन झालं नाही तर हा पक्ष देखील मोठी मजल मारु शकतो. याआधी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ते आपल्याला बघायला मिळालं होतं. वंचित आणि काँग्रेसची आघाडी झाली तर काही ठिकाणी महायुतीसाठी मोठं चॅलेंज असणार आहे. त्याठिकाणी महायुती कदाचित केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या रिपब्लिक पक्षाला ताकद देऊ शकते. त्यामुळे तिथे कशी लढत होते? ते पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

---------------

### मविआचे खासदार

आश्वासन दिलं. एकीकडे मनोज जरांगे पाटील हे शौर्य पाटीलच्या कुटुंबीयांची भेट घेत असताना दुसरीकडे मविआचे खासदार अमित शाहांना भेटले आहेत. त्यावेळी, अमित शाह यांनी तात्काळ एसआयटी नेमण्याचे आश्वासन दिले. उद्याच विशेष तपास पथक नेमण्याबाबत सूचना देतो, असे अमित शाह यांनी म्हटले. खासदार निलेश लंके यांच्याकडून अमित शाह यांना पत्र देण्यात आलं असता, याबाबत माझ्याकडे शरद पवार यांचेही पत्र आल्याचे अमित शाह यांनी सांगितले. याप्रकरणी मनोज जरांगे पाटील यांनीही भूमिका मांडली. सरकारने नेमलेल्या समितीने अहवाल दिलेला आहे, त्यानुसार या घटनेला, शौर्यच्या मृत्यूला शाळा आणि शिक्षकच जबाबदार आहेत. त्यामुळे, या अहवालानुसार तरी अमित शाह यांनी पाटील कुटुंबीयांवर मरणोत्तर अन्याय होऊ देऊ नये, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले. शौर्य पाटील मृत्यू प्रकरणात आठ दिवसात आरोपींना अटक न झाल्यास मुंबई आम्ही बंद करू शकतो, आमच्या मुलाचे बलिदान वाया जाणार नाही, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले.

--------------

### ओबीसींवर टांगती

वडेट्टीवार यांनी केली. राज्यात महापालिका निवडणुकांची घोषणा झाली. या निवडणुकांमध्ये भाजप आणि शिंदे यांची युती असणार पण अजित पवारांचा पक्ष नसणार, हा महायुतीचा डाव आहे. सत्तेचा मलिदा खाताना अजित पवारांचा पक्ष चालतो पण निवडणुकीत काँग्रेसच्या सेक्युलर मतांचे विभाजन करण्यासाठी अजित पवारांना दूर ठेवणे कितपत योग्य आहे.माध्यमांशी बोलताना काँग्रेस नेते वडेट्टीवार यांनी महायुतीवर सडकून टीका केली. हसन मुश्रीफ यांना कॅबिनेट मंत्री करायचे, त्यांच्याबरोबर चहा-नाश्ता करायचा आणि निवडणूक आली की नवाब मलिक यांचा मुद्दा पुढे करून युतीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाला दूर ठेवायचे हा दुटप्पीपणा आहे. निवडणुकीत हिंदुत्वाचा मुद्दा पुढे करत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाला जवळ करायचे आणि मतांचे विभाजन करण्यासाठी अजित पवार यांना स्वतंत्र निवडणूक लढवायला लावायची, महायुतीचे हे राजकारण लपून राहिलेले नाही. हिंदू विरुद्ध मुस्लिम केल्याशिवाय भाजप निवडणुका जिंकू शकत नाही म्हणून निवडणुका आल्या की हा वाद निर्माण केला जातो अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

----------------

### गेवराई राडा; भाजपचे बाळराजे

भाजप नेते बाळराजे पवार यांच्यासह पाच जणांना सोमवारी रात्री अटक करण्यात आली आहे. गेवराई नगर परिषद निवडणुकीदरम्यान प्रभाग क्रमांक ११ मधील एका मतदान केंद्राजवळ किरकोळ वादातून दोन्ही गटांत मारामारी सुरू झाली होती, ज्यामुळे शहरातील वातावरण चांगलेच तापले होते. या वादाला हिंसक वळण लागले. भाजप नेते बाळराजे पवार आणि त्यांच्या साथीदारांनी थेट अमरसिंह पंडित यांच्या कृष्णाई निवासस्थानी घुसून त्यांचे स्वीय सहायक अमृत डावकर यांना मारहाण केली. यानंतर संतप्त झालेल्या राष्ट्रवादीच्या जयसिंग पंडित आणि पृथ्वीराज पंडित यांच्यासह इतरांनी माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या घरासमोर जाऊन गाडीची तोडफोड केली, ज्यामुळे दोन्ही गट पुन्हा एकदा आमने-सामने आले होते. या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलिसांनी स्वत:हून घेतली. पोलिस रामराम आघाव यांच्या फिर्यादीवरून दोन्ही गटातील ४० ते ५० जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

--------------

### माजी आ.धोंडे यांच्या महेश साखर

योजनेतून पाणी उपलब्ध झाल्याने हजारो एकर शेतीत ऊसाचे क्षेत्र निर्माण झाले असल्याने या कारखान्याचे पुनरुज्जीवन करताना तो खाजगी न करता सहकारीच रहावा. यापुढे शेतकऱ्यांचे हित जोपासावा यासाठी माजी आ.भीमराव धोंडे यांनी अथक प्रयत्न केले.साखर आयुक्त,सहकार मंत्रालय व केंद्रीय सहकार मंत्रालय यांनी महेश ( कडा) सहकारी साखर कारखान्याचे लायसन रद्द केले असताना ते पुन्हा पुनर्जीवित व्हावे यासाठी लोकशाही पद्धतीने मतदार संघाचे शेतकऱ्यांचे नेते माजी आ. भीमराव धोंडे यांनी आंदोलन करून साखर आयुक्त व राज्य सरकार, केंद्रसरकारचे लक्ष वेधले होते. माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या या लढ्याला यश आले आहे.ज्यांनी ज्यांनी या प्रकरणी माजी आ. धोंडे यांच्या सोबत खंबीर साथ दिली त्याचे आभार मानले.यापुढे या मतदार संघात शेतकरी,कामगार यांचे हित जोपासण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली माजी आ.भीमराव धोंडे हे ताकदीने काम करणार आहेत.

-----------------

### राजधानीत नो पीयूसी नो पेट्रोल

पेक्षा जास्त नोटिसा, ९ कोटी रुपयांहून अधिक दंडात्मक नोटिसा, बायोगॅस उत्सर्जन कमी करण्यासाठी १०,००० हीटर्सचे वाटप आणि ३,२०० डिझेल जनरेटरवर कारवाई केली आहे. सिरसा यांच्या मते, नोव्हेंबरमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत २० पॉइंट अदक घट झाली आहे.

-------------

### मनरेगा चे नाव बदलल्यास

असून भाजपाशी संबंधित असलेल्या संघ आणि भाजप यांच्यातील एका व्यक्तीचे नाव या रोजगार हमी योजनेच्या कामाला देण्याच्या हालचाली दिल्लीमध्ये सुरू आहेत आणि तसा प्रस्ताव देशाच्या सभागृहामध्ये ठेवण्यात आला होता मात्र या विरोधात काँग्रेस आता रस्त्यावर उतरण्याची तयारी करत आहे अनेक चांगल्या योजनांचे नाव केवळ काँग्रेस आणि गांधी द्वेष म्हणून भाजप बदलत असताना काँग्रेस हे स्वीकारणार नाही याविरुद्ध राज्यातच नव्हे तर देशभरात आंदोलन करण्याचा इशाराही काँग्रेस समितीने दिला आहे

-------------------

# अंबाजोगाई -लातूर मार्गावर कारचा भीषण अपघात; ३ ठार, ४ जण जखमी

**लातूर । प्रतिनिधी**

अंबाजोगाई-लातूर राष्ट्रीय महामार्गावर बीड आणि लातूर जिल्ह्याच्या सीमेवर सोमवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. या अपघातात स्विफ्ट डिझायर आणि स्कॉर्पिओ या दोन वाहनांची समोरासमोर धडक झाली. या दुर्घटनेत तीन जण जागीच ठार झाले असून, चार जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी आणि स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल केले. पोलिसांनी या अपघाताची नोंद केली असून पुढील तपास करण्यात येत आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, एमएच १२ सीवाय ७०२२ क्रमांकाची स्विफ्ट डिझायर या कारमधून चार जण सायगाव येथे सुरू असलेल्या उरुसासाठी जात होते. भरधाव वेगात असलेल्या या कारवरील चालकाचा ताबा सुटला. यामुळे कार थेट रस्त्याच्या दुभाजकावरून उसळून विरुद्ध दिशेने येणा-या एमएच २४ वाय ४७७१ क्रमांकाच्या स्कॉर्पिओ गाडीवर जोरात आदळली. यामध्ये तीन जणांचा मृत्यू झाला.हा अपघात इतका भीषण होता की, स्विफ्ट डिझायरमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला. तर, स्कॉर्पिओमधील दोन महिलांसह अन्य दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले.गंभीर जखमींना तातडीने पुढील उपचारासाठी लातूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. जखमी आणि मृतांची ओळख पटवण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते. उरुसाला जाणा-या प्रवाशांवर काळाने घाला घातल्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघातातील मृतांची नावे आणि कोणत्या गावचे रहिवासी आहेत, हे अद्याप समजू शकलेले नाही. पोलिस घटनेचा पंचनामा करत असून पुढील तपास सुरू आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. १७ डिसेंबर २०२५



# एसपींच्या कडक शिस्तीतून नेकनूर पोलीस ठाण्याला मुभा

## मांजरसुंबा-चौसाळा -लिंबागणेश -नांदूर फाटा हद्दीत अवैद्य धंद्याना आशीर्वाद

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी पदभार घेतल्यानंतर बीड जिल्ह्यातील अवैद्य धंदे गुन्हेगारी अवैद्य व्यवसाय आटोक्यात आणल्याचे दिसत आहे मात्र तालुक्यातील पोलीस अधीक्षकांच्या शिस्तीचा आणि कडक नियमाचा काहीच फायदा होत नसल्याचे दिसत आहे संबंधित ठाणे प्रमुखच या धंद्यांना पाठबळ देत असल्याचे दिसत आहे मांजरसुंबा चौसाळा नांदुर फाटा आधी ठिकाणी अवैद्य धंद्याचा सोळसळा बिनबोपाठ नेकनूर पोलिसांच्या आशीर्वादाने सुरू असल्याचे बोलले जात आहे.

पोलीस अधीक्षक यांनी पोलिसांची प्रतिमा सुधारण्यासाठी शिस्त लावली आहे जिल्ह्यातील सर्वच ठाण्याच्या



कार्यक्षेत्रातील सर्व अवैध धंदे कमी झाल्याचे दिसत असताना नेकनूर पोलीस ठाण्याच्या आधी मध्ये मोठ्या प्रमाणात अवैध व्यवसाय अवैध धंदे सुरू असल्याचे बोलले जात आहे शासनाने बंदी घातलेला गुटखा सर्रासपणे विकला आणि पुरवठा केला जातो या पोलीस ठाणे अंतर्गत चौसाळा लिंबागणेश मांजरसुंबा नांदूर फाटा ही महत्त्वाची ठिकाणे असताना या ठिकाणी अवैद्य प्रवासी वाहतूक अवैद्य दारू विक्री पत्त्याचे क्लब मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे दबके आवाजात बोलले जात आहे या ठाण्याच्या अंतर्गत अनेक महामार्ग जात असल्याने धाबे हॉटेलची संख्या मोठ्या प्रमाणात आहे याच हॉटेल धाब्यावर अवैधरित्या दारू विक्री केली जाते याला संबंधित पोलीस ठाण्याचे बीट अंमलदार प्रोत्साहन देत असल्याचेही बोलले जात आहे अनेक वेळा खुलेआम दारू विक्री होत असताना पोलीस मात्र बघायची भूमिका घेतात दारूबंदी विभाग हा केवळ नावालाच असून त्यांना तर कोणीच भीत नसल्याचे दिसत आहे याशिवाय पोलिसांचे चांगलेच फावले होत असल्याचे पोलीस अधीक्षकांच्या नावावरून दिसत आहे पोलीस अधीक्षक शिस्तीचे आणि खडक आहेत अशी भीती दाखवून पूर्वी मिळणाऱ्या बक्षिसाची रक्कम दुप्पट झाली आहे त्यामुळे हाकणा बोंब अशी परिस्थिती या भागांमध्ये झाली असून पोलिसांनी अवैध व्यवसाय करणाऱ्याची लागेभादे असल्याचेही दिसत आहे. चौसाळा व परिसरामध्ये त्याचबरोबर नेकनूर आणि परिसरामध्ये पोलीस चौकी असली तरी त्याचे नियंत्रण नेकनूर पोलीस ठाणे अंतर्गत असल्याने या ठिकाणी देखील मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री प्रवासी वाहतो आणि पत्त्याचे क्लब सुरू असल्याचे बोलले जात आहे मात्र पोलिसांनी अद्यापही कोणतीच कारवाई केली असल्याचे दिसून येत नाही.

### चौसाळा मांजरसुंबा मिळकतीचे मोठे ठिकाण

नेकनूर पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या चौसाळा आणि मांजरसुंबा ही महत्त्वाची ठिकाणे आहेत काही महिन्यापूर्वी चौसाळा येथील एका बारवर छापा मारून वेश्या व्यवसाय करणाऱ्या पिढी त्यांना ताब्यात घेतली होती ही कारवाई बीड पोलिसांनी केली होती त्यासोबतच मांजरसुंबा येथील एका हॉटेलवर पत्त्याचा क्लब सुरू असल्याच्या माहितीनंतर छापाही मारला होता विशेषता आताही त्या हॉटेलच्या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात पत्त्याचा क्लब सुरू असल्याची चर्चा आहे मात्र नेकनूर पोलीस याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे बोलले जात आहेत कारण मांजरसुंबा आणि नेकनूर त्याचबरोबर चौसाळा ही पोलिसांच्या मिळकतीचे ठिकाण असल्याचे बोलले जात आहे

## थोडक्यात

### सण उत्सवानिमित्त वाद्य वाजविण्याचे दिवस जाहिर

बीड । प्रतिनिधी

उत्सव कालावधीत पंधरा (१५) दिवस सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत वाद्य वाजविण्यास परवानगी देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी ध्वनी प्राधिकरण तथा जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेशी सल्लामसलत करुन दिवस निश्चित करुन त्याची आगाऊ यादी ०१ जानेवारी किंवा तत्पूर्वी जाहीर करणेबाबत नमूद केले आहे. जिल्हयात ध्वनी प्रदुषण नियंत्रण प्राधिकरण यांचे कार्यालय नसल्याने पोलीस अधिक्षक, बीड यांनी बीड जिल्हयात ०१ जानेवारी २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत सकाळी ६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत वाद्य वाजविण्याची परवानगी देण्यासाठी १५ दिवस प्रस्तावित केले आहेत. बीड जिल्ह्यात ध्वनी प्रदुषण नियम २००० मधिल नियम ३ व ४ तसेच ध्वनि प्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० मधिल अटी व शर्तीस अधिन राहून खालील प्रमाणे नमुद दिवशी ०१ जानेवारी २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधी दरम्यान सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत ध्वनीची मर्यादा राखून वाद्य वाजविण्यास परवानगी देण्यात येत आहे. शिवजंयती १ दिवस, ईद ए मिलाद १ दिवस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती १ दिवस, १ मे महाराष्ट्र दिन १ दिवस, गणपती उत्सव चार दिवस अनंत चतुर्दशीसह शेवटचे तीन दिवस, नवरात्री उत्सव २ दिवस अष्टमी आणि नवमी, दिपावली एक दिवस, लक्ष्मीपुजन, ख्रिसमस एक दिवस, ३१ डिसेंबर १ दिवस, उर्वरित दोन दिवस महत्वाच्या कार्यक्रमासाठी राखीव असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### सेवानिवृत्त तहसीलदार शशिकांत देशपांडे यांचे निधन



बीड- येथील सेवानिवृत्त तहसीलदार शशिकांत देशपांडे यांचे वृद्धापकाळाने राहत्या घरी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८७ वर्ष होते.बीड येथे तहसीलदार म्हणून सेवानिवृत्त झालेले शशिकांत देशपांडे हे मनमिळाऊ स्वभावाचे, कडक शिस्तीचे म्हणून परिचित होते. आपल्या नोकरीच्या काळात प्रामाणिकपणा आणि सचोटी मुळे ते लोकप्रिय होते. गेल्या तीन साडेतीन वर्षांपासून ते आजारी होते. मंगळवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. बीड येथील प्रसिद्ध डॉक्टर सुहास देशपांडे यांचे तर वडील होते. शशिकांत देशपांडे यांच्या पार्थिव देहावर सायंकाळी सहा वाजता अंकुश नगर स्मशान भूमी येथे अंत्यसंस्कार होतील.

### प्रा.बालाजी बोडके यांना पीएच.डी प्रदान

माजलगाव । प्रतिनिधी

येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इतिहास प्रमुख प्रा.बालाजी बोडके यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत पीएचडी प्रदान करण्यात आली आहे.




प्रा.बालाजी बोडके यांनी प्रा. डॉ.प्रशांत साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'पानिपत (१७६१) युद्धाची मीमांसा' या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता. त्यांच्या संशोधन कार्याची दखल घेऊन त्यांना पीएच.डी. प्रदान केली आहे. प्रा.बालाजी बोडके यांच्या यशाबद्दल म.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समिती प्रमुख एड. बी. आर.डक,प्राचार्य डॉ.जी.के.सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन.के.मुळे, उपप्राचार्य डॉ. एम.ए.कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते,उपप्राचार्य पवन शिंदे,प्रा. सुदर्शन स्वामी यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## बीड तालुका शालेय पोषण अधीक्षकपदी प्रणिता गंगाखेडकर

बीड । प्रतिनिधी

येथील बीड पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती प्रणिता केशवराव गंगाखेडकर यांची शालेय पोषण अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.



बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी जितिन रहमान यांनी मंगळवार दिनांक १६ डिसेंबर रोजी सदर नियुक्तीचे आदेश निर्गमित केले आहेत. शिक्षण विस्तार अधिकारी तुकाराम पवार यांच्या सेवानिवृत्तीमुळे सदर शालेय पोषण अधीक्षक पद रिक्त होते. श्रीमती प्रणिता गंगाखेडकर या उपक्रमशील शिक्षण विस्तार अधिकारी आहेत. बीड तालुक्यात शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व विविध उपक्रम राबवण्यासाठी त्यांचे योगदान आहे.

## २०२५ खरीप ई - पीक पाहणीसाठी समिती गठित

**बीड । प्रतिनिधी**

खरीप हंगाम २०२५ मध्ये विहित मुदतीत ई-पीक पाहणी (DCS) नोंद न झालेल्या शेतकऱ्यांच्या पीकाची ऑफलाईन पाहणी करण्यासाठी उप विभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

उपविभागीय अधिकारी अध्यक्ष, तहसीलदार सदस्य, गटविकास अधिकारी सदस्य, तालुका कृषी अधिकारी सदस्य असून समितीने खालीलप्रमाणे कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करण्यात यावी.

फेरचौकशीः ज्या शेतकऱ्यांना काही कारणांमुळे पिकांची नोंद करता आली नाही आणि सदर नोंद ७/१२ उता-यावर आली नाही, त्यांच्याबाबत प्रत्यक्षात पीक असल्याची फेरचौकशी करून अहवाल दिनांक १५ जानेवारी, २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

सर्व उप विभागीय अधिकारी (अध्यक्ष) यांनी समितीच्या कामकाजाचा दररोज आढावा घ्यावा आणि दैनिक अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास व पणन विभागास सादर करावा. समितीने करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावरुन लवकरच निर्गमित करण्यात येतील. या अहवालानुसार पणन विभागाने पीक खरेदी करण्याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी. सदर विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन, सर्व संबंधितांनी तातडीने कार्यवाही करावी असे निवास उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## पान ६ वरुन...

### गेवराई पोलीसांनी केले दोघा

ऊर्फ भोला अर्जुन पवार, वय-२३ वर्षे, रा.राहेरा, ता. घनसांगवी, जि.जालना, ह.मु. मयुर पार्क, छत्रपती संजभाजीनगर, २) विशाल यशवंत पवार, वय-१८ वर्षे, रा. सातोना (खु), ता. परतुर, जि. जालना यांना अटक करून त्यांचेकडे विचारपूस केली असता त्यांनी व त्यांचा एक फरार साथीदार असे तीघांनी गुन्हा केल्या कबुल करून गुन्ह्यातील गेला मुद्देमाला पैकी आरोपी क्र.१) याच्या ताब्यातून रोख रक्कम १८३००/-रू व आरोपी क्र.२) याच्या ताब्यातून १.५ ग्रॅम वजाने मणी मंगळसुत्र जुने वापरते किंमत १९०००/-रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीतांकडे पोलीस कोठडी दरम्यान अधीक तपास केला असता आरोपीतांनी गुन्हा करण्यासाठी वापरलेली मोटार सायकल ही मुकुंदवाडी परिसर, छत्रपती संभाजीनगर येथून चोरी केल्याचे तसेच त्यांनी पोलीस ठाणे तलवडा गुरनं. २६७/२०२५, कलम-३०३(२) भा. न्या. संहिता-२०२३ मधील होंडा शाईन कंपनीची मोटार सायकल किंमत-६००००/-रू व पोलीस ठाणे मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर हद्दीतून होडा युनीकॉर्न कंपनीची मोटार सायकल किंमत-१०००००/-रू ची चोरी केल्याचे कबुल केले आहे.सदर गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक नवतीनत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उप अधीक्षक अभिजीत कटके, पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि. संतोष जंजाळ, सपोनि.दिपक लंके यांच्या मार्गदर्शनाखाली पोह/९५४ हंबर्डे यांनी पोकॉ/२१९८ धिरज खांडेकर, पोकॉ/२४१ गोरख डोके यांच्या मदतीने केला असून सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपीतांना मा. न्यायालयाने १४ दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली असून गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.

### कुंभार समाजाच्या उन्नतीसाठी

कुमार यांनी सहभागी कारागिरांना विद्युत चाकावर काम करण्याचे आधुनिक प्रशिक्षण दिले. माती कलेला येणार सुगीचे दिवस आपल्या मार्गदर्शनात आ. धस पुढे म्हणाले की, सध्या दैनंदिन वापरात मातीच्या भांड्यांचे महत्त्व वाढत असून भविष्यात याला मोठी मागणी असणार आहे. समाजाने एकत्र येऊन हा व्यवसाय केल्यास मोठी प्रगती साध्य होईल. चांगल्या दर्जाच्या वस्तू तयार करण्यासाठी आपण कर्नाटकातून माती आणू.खामगाव (कर्नाटक) येथे चार महिन्यांचे प्रगत प्रशिक्षण घेण्यासाठी २० जणांची निवड करण्याची इच्छा आहे.तिथे प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा ४ हजार रुपये मानधन दिले जाईल. माती मळणी यंत्र आणि कच्च्या मालासाठी बँकेमार्फत अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. महाराष्ट्र कुंभार महासंघाचे अध्यक्ष विनायक राऊत यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,या उपक्रमासाठी आणि कुंभार समाजाच्या प्रश्नांसाठी आ. सुरेश धस यांचे वेळोवेळी मोलाचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले आहे. यावेळी निशिकांत गरगडे,मुकुंद गरगडे, शांतीनाथ देशमुख, स्वप्नील कुंभार, संतोष देशमुख, ज्ञानेश्वर पालकर, लक्ष्मण देशमुख, प्रशांत देशमुख, अरुण देशमुख, सोपान बावदानकर, विशाल देशमुख, पत्रकार किरण पोकळे,सचिन रानडे,प्रवीण कदम, प्रणव देशमुख, अविनाश कदम, बाबुराव कदम यांच्यासह लाभार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन राजेंद्र लाड यांनी तर आभार अरुण देशमुख यांनी मानले.

### लोकनेते गोपीनाथ मुंडे

आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी सरपंच गायकवाड म्हणाले की, महाराष्ट्राला पुरोगामी विचारांचा समतावादी चळवळीचा आणि न्याय संघर्षाचा उज्वल इतिहास आहे.म.फुले,राजर्षि शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे त्यांनी वंचित आणि बहिष्कृत समाजाला आत्मसन्मान मिळवून देण्यासाठी विचार तर दिलाच शिवाय लोकचळवळही चालविल्या.लोकनेते मुंडेसाहेबांनी जनसेवेसाठीच संपुर्ण आयुष्य खर्च केले.अभ्यासु आणि जनतेशी नाळ जुळलेले लोकनेते गोपीनाथराव मुंडे होते.सायकल,बैलगाडी आणि पायी प्रवास करून गाव वाड्यावर त्या आणि तांडयावर मुक्काम करत सर्वसामान्य गोरगरिबांच्या हृदयास स्थान निर्माण केलेले गाव,तालुका, जिल्हा,राज्य आणि देशपातळीवरचे राष्ट्रीय नेते स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे कार्य म्हणजे राजकीय, सामाजिक,सांस्कृतिक,शैक्षणिक क्षेत्रातील विद्यापीठासमान होते.त्यांचे अकाली जाणे म्हणजे अक्षरशः भर दुपारी अत्यंत कडक उन्हात सूर्य मावळल्यासारखे आहे.माणुसकी हे तत्व गोपिनाथराव मुंडे साहेबांनी आयुष्यभर जपले.दुर्दैवाने त्यांचे झालेले अकाली निधन हे तमाम महाराष्ट्र आणि हिंदुस्तानच्या दृष्टीने आणि विशेषतः मराठवाडा आणि बीड जिल्ह्याच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी आहे असे सांगीतले.

### नैसर्गिक शेती काळाची गरज

याविषयी शेतकऱ्यांना माहिती सांगितली कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना गोपीनाथ पवार तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी योजनेची माहिती व कृषी विभागाने तयार केलेले महाविस्तार ए.आय.प महत्व या विषयी शेतकऱ्यांना सांगितले या वेळी मंडळ कृषी अधिकारी जे.ल खेडकर,कृषी सखी आणि गटातील शेतकरी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहायक कृषी अधिकारी श्रीमती बनसोडे यांनी केले.

## रमाई घरकुलाचा प्रश्न मार्गी लावल्यामुळे आ.धस यांचे डॉ.जावळे, अडागळे यांनी मानले आभार

पाटोदा ( प्रतिनिधी )

रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेप्रमाणे दुमजली घरकुल बांधकामाची परवानगी द्यावी.अशी मागणी आष्टी,पाटोदा,शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी नागपूर येथे सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशना दरम्यान १३ डिसेंबर शनिवार रोजी पुरवणी -मागण्यांवरील चर्चे दरम्यान मागणी करुन हा प्रश्न मार्गी लावल्यामुळे आ.सुरेश धस यांचे रिपाईचे डॉ.नरेंद्र जावळे,पाटोदा नगरपंचायतचे सभापती किशोर अडागळे,गोरख झेंड व युवा नेता यांनी आभार मानले आहेत.

पाटोदा तालुक्यातील व पाटोदा शहरांमधील गरीब,विधवा महिला,

एकल कुटुंबे व अपंग व्यक्तींना रमाई आवास योजनेअंतर्गत



घरकुलांचा लाभ मिळणे अत्यावश्यक आहे. अशा व्यक्तींना जर घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी जागा उपलब्ध नसेल तर शासकीय जमिनीवर तातडीने घरे मंजूर करावीत.वाढती शहरी लोकसंख्या आणि घरांची तीव्र गरज लक्षात घेता,दुमजली व बहुमजली घरकुलांचा पर्याय अधिक व्यवहार्य असल्याचे आमदार सुरेश धस यांनी स्पष्ट करुन त्यांनी हा रमाई आवास योजनेचा दुमजली व बहुमजली घरकुल बांधण्यासाठी परवानगी देण्यात यावी अशा प्रकारची योग्य मागणी नागपूर येथील अधिवेशनात दिनांक १३/१२/२०२५ शनिवार रोजी सभागृहात पुरवणी मागण्यांवरील चर्चे दरम्यान केली असुन यामुळे गरजवंत दिन दलीत समाजातील बांधवांना व भगिनींना या रमाई आवास योजनेचा फायदा होवुन त्यांना स्वतःचे घर होईल.आमदार सुरेश धस यांनी सभागृहात ही मागणी करुन हा प्रश्न मार्गी लावल्यामुळे आ.सुरेश धस यांचे पाटोदा तालुका रिपाईचे डॉ.नरेंद्र जावळे,पाटोदा नगरपंचायतचे सभापती किशोर अडागळे, समाजसेवक गोरख झेंड व युवा नेता यांनी आभार मानले आहेत.

## साळींबा येथे हरिनाम सप्ताहाचे आयोजन

वडवणी प्रतिनिधी :-

साळींबा येथे वै.ह.भ.प. पंढरीनाथ महाराज वारकरी यांच्या पुण्यतिथी निमित्त दिनांक २१ डिसेंबर ते २८ डिसेंबर पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन साळींबा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी साळींबा येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेल्या असून यामध्ये दैनंदिन कार्यक्रमः पहाटे ४ ते ६ काकडा भजन, ७ ते ८ विष्णुसहस्रनाम, ८ ते ९ संतपुजा नाष्टा, ९ ते १ गाथा पारायण, १ ते ३ भोजन व विश्रांती, ३ ते ५ गाथा पारायण,५.३० ते ६.३० हरिपाठ, ६.३० ते ८ जेवन, ८.०० व १०.०० हरिकीर्तन व नंतर हरिजागर होणार आहे यामध्ये रविवार दि.२१/१२/२०२५ ओंकारेश्वर पंचमुखी महादेव मंदीर संस्थान, पांगरी रोड, बीड) भागवताचार्य ह.भ.प.प.पु.गु. महंत प्रेममुर्ती सच्चिदानंद महाराज जाधव,सोमवार दि.२२/१२/२०२५ ह.भ.प.श्री. इंद्रजित महाराज रसाळ (तिगांव ऐतिहासिक कीर्तनकार),मंगळवार दि.२३/१२/२०२५ह.भ.प. भागवताचार्य श्रीराम महाराज चोले (खडकी),बुधवार दि.२४/१२/२०२५,ह.भ.प.श्री. भगवान महाराज राजपुत (महंत राजा हरिश्चंद्र संस्थान, पिंपरी,गुरुवार दि.२५/१२/२०२५

ह.भ.प.श्री. विष्णु महाराज जगताप (अध्यक्ष गीता मंदीर श्री क्षेत्र पैठण,शुक्रवार दि.२६/१२/२०२५ ह.भ.प.श्री. महादेव महाराज चाकरवाडीकर (श्री क्षेत्र चाकरवाडी),शनिवार दि.२७/१२/२०२५

ह.भ.प.श्री. सिताराम महाराज रोडगे (राजेटाकळीकर ) यांचे हरिकीर्तन होणार आहे तर

गु.श्री.ह.भ.प. बन्सी महाराज उबाळे (अध्यक्ष गिता मंदीर पंढरपूर) रविवार दि.२८/१२/२०२५ रोजी स.१० ते १२ यावेळेत भव्य काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे तरी या अखंड हरिनाम सप्ताहाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन साळींबा ग्रामस्थांनी केले आहे.

## शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांमध्ये डिजिटल ग्रंथालयांची भूमिका प्रेरणादायी -प्रा.डॉ.बापूसाहेब भोसले

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या ग्रंथालय विभाग आणि वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी 'डिजिटल ग्रंथालय आणि पर्यावरण संरक्षण' या विषयावरती एक दिवसीय कार्यशाळा महाविद्यालयात संपन्न झाली. याप्रसंगी भारतीय ग्रंथपालनशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांना अभिवादन करण्यात आले. 'डिजिटल ग्रंथालय आणि पर्यावरण संरक्षण' या एक दिवसीय कार्यशाळेचे उद्धाटन प्राचार्य डॉ. विश्वास कदम, श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर गढी यांनी केले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा विभाग शिवाजी महाविद्यालय, परभणी येथील प्रा.डॉ.बापूसाहेब भोसले, हे होते तर व्यासपिठावर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक तसेच प्रा. डॉ. सुनील जाधव, कनिष्ट विभाग प्रमुख प्रा. सतीश जरांगे यांची उपस्थिती होती. उद्धाटनपर भाषणात बोलताना प्राचार्य डॉ.विश्वास कदम म्हणाले कि, डिजिटल युगात ग्रंथालयांची बदलती भूमिका अधोरेखित करत पर्यावरणपूरक विचारसरणीसाठी डिजिटल ग्रंथालये कशी उपयुक्त ठरतात यावर प्रकाश टाकला.




कागदविरहित कार्यपद्धती, ऑनलाइन माहिती साठवण आणि ज्ञानप्रसार यामुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे यांनी केले. प्रास्ताविकात कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. संरक्षणाच्या दृष्टीने डिजिटल ग्रंथालयांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पेपरलेस ग्रंथालयामुळे पर्यावरण संरक्षणाला मोठी मदत होते. कागदाचा वापर कमी झाल्याने वृक्षतोड थांबवण्यास हातभार लागतो. तसेच माहिती शोधणे, जतन करणे व शेअर करणे अधिक सोपे, वेगवान आणि अचूक होते. संगणक, टॅबलेट, मोबाईल किंवा इंटरनेटच्या साहाय्याने वाचकांना कुठूनही व कधीही माहिती मिळू शकते असे सांगितले. यानंतर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक यांनी कार्यशाळेत बोलत असताना पर्यावरण संरक्षणासाठी जनजागृती निर्माण करण्यात ग्रंथालये आणि शैक्षणिक संस्था यांची महत्त्वाची जबाबदारी असून, डिजिटल साधनांच्या माध्यमातून ही जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडता येते, असे त्यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना प्रा.डॉ.बापूसाहेब जीवनराव भोसले म्हणाले कि, आजच्या डिजिटल युगात पेपरलेस लायब्ररी ही शाश्वत विकासाची संकल्पना असून शिक्षण, संशोधन आणि ज्ञानप्रसारासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. पर्यावरणीय समस्यांची सद्यस्थिती मांडत शाश्वत विकासासाठी माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. डिजिटल ग्रंथालयांमधील ई-पुस्तके, संशोधन लेख, डेटाबेस आणि ऑनलाइन शैक्षणिक साधने विद्यार्थ्यांना पर्यावरणविषयक अद्ययावत माहिती सहज उपलब्ध करून देतात, असे त्यांनी सांगितले. पर्यावरण संरक्षणासाठी संशोधन, शिक्षण आणि जनजागृती यामध्ये डिजिटल माध्यमांचा योग्य वापर काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. अध्यक्षीय सामारोपात बोलत असताना प्रा. डॉ. सुनील जाधव म्हणाले कि, डिजिटल ग्रंथालये आणि पर्यावरण संरक्षण यांचा परस्पर संबंध स्पष्ट करत, प्रत्येक विद्यार्थ्याने आणि शिक्षकाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती व सामाजिक बांधिलकी वाढते, असे त्यांनी नमूद करून आयोजकांचे अभिनंदन केले. या कार्यशाळेच्या प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी करून दिला. या कार्यशाळेचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. बी. बी. लोखंडे यांनी केले तर आभार प्रा. बाळासाहेब जोशी यांनी मानले. या कार्यशाळेला सर्व प्राध्यापक, वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थीनी आपला सहभाग नोंदवला.

## मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण शिबिराचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पिठाधीश प.पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशीर्वादाने व गुरुपुत्र चंद्रकांत मोरे यांच्या आदेशानुसार सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर आयोजित माजलगाव तालुक्यातील



वाघोरा,सुलतानपूर (माळेवाडी), धर्मेवाडी,नाथरा तसेच अंबाजोगाई, परळी वैद्यनाथ येथील खंडोबा नगर,प्रिया नगर, पोहनेर येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात दि.१८ ते २५ डिसेंबर दरम्यान मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले असून या शिबिरात बी पी,शुगर, इसीजी, फिजिओथेरपी तसेच नाडी परीक्षण व सर्व रोग निदान मोफत करण्यात येणार आहे तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी यांनी केले आहे.

जा.क्र.न.प.अंबड/नामांतर/२०२५/७१५
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक ८/१२/२०२५

### नाव बदलण्याचा जाहिरनामा

अर्जदार श्री./सौ. श्रीमती :- १) सुचिता गणेश पेदाहे २) गणेश भागवत पेदाहे

प्रकरण : सर्वे नं -१२ प्लॉट नं- ३९ (अ) सिटी सर्वे नं- १८६७/अ/५१ न.प. मि.नं-१८-१११-३९ (अ) चे हस्तांतरन बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (१८-१११-३९ (अ)) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा
पुर्व - प्लॉट नं- ३४ ब
पश्चिम :- ९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण :-प्लॉट नं- ३९ ब
उत्तर प्लॉट नं - ३८ ब

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

cmyk

# कर्ज फेडण्यासाठी सावकाराने शेतकऱ्याला किडनी विकायला लावली

एकीकडे देशात आणि राज्यात राज्यकर्त्यांकडून विकसित भारत आणि उज्ज्वल भविष्याची स्वप्नं दाखवली जात असतानाच स्वातंत्र्यापासूनच उपेक्षित राहिलेल्या विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यात आजही गरिबीमुळे होणारी शेतकऱ्यांची होरपळ किती विदारक असू शकते, याचे मूर्तिमंत उदाहरण समोर आले आहे. चंद्रपूर जिल्ह्यात एका सावकाराने आपले कर्जाचे पैसे वसूल करण्यासाठी शेतकऱ्याला अक्षरश: स्वत:ला विकायला लावले आहे.

कर्जाचा परतावा करण्यासाठी सावकारांनी शेतकऱ्याला किडनी विकायला लावल्याचा धक्कादायक आरोप चंद्रपूर जिल्ह्यातील एका तरुण शेतकऱ्याने केला आहे. नागभीड तालुक्यातील मिंथुर येथे राहणाऱ्या रोशन कुडे या शेतकऱ्याने हा आरोप केला आहे. काही वर्षांपूर्वी रोशन याने दुधाचा व्यवसाय सुरू करण्यासाठी एक लाख रुपये व्याजाने खाजगी सावकाराकडून घेतले होते. मात्र, दुर्दैवाने त्याची जनावरे मेली आणि तो



साावकारचे कर्ज फेडू शकला नाही. तेव्हापासून या खाजगी सावकाराने वारंवार पैसे देण्याचा तगादा लावला.

दिवसेंदिवस पैसे थकत गेल्याने मुद्दलाची रक्कम आणि व्याजाच्या रकमेत मोठी वाढ झाली. अखेर त्या सावकाराने पैसे फेडण्यासाठी शेतकऱ्याला त्याची किडनी विकण्याचा सल्ला दिला आणि त्या सावकाराच्या सल्ल्यानेच रोशन कुठे या शेतकऱ्याने आधी कोलकाता आणि नंतर तिथून कंबोडिया येथे जाऊन ८ लाख रुपयांना स्वत:ची किडनी विकली. सावकारामुळेच माझ्यावर ही वेळ आल्याचा आरोप करत पीडित शेतकऱ्याने सावकारावर कारवाईची मागणी केली आहे. या घटनेमुळे संपूर्ण राज्यात एकच खळबळ उडाली आहे. एकीकडे राज्यात शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या गमजा मारल्या जात असतानाच ग्रामीण भागात शेतकऱ्यांचे प्रश्न किती भीषण आहेत आणि त्यांची अवस्था किती दयनीय आहे, हे या घटनेमुळे पुन्हा एकदा दिसून आले आहे. आता यावर राज्य सरकार आणि कृषीमंत्री किती तत्परतेने कारवाई करणार आणि संबंधित सावकाराला काय शिक्षा देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# काळ्या रंगाची गाजराची शेती देते अधिक फायदा

आपण आजपर्यंत लाल रंगाची गाजरं पाहिली आणि त्याची शेतीही केली असेल. सध्या काळ्या गाजराच्या शेतीकडे बरेच लोक वळताना दिसत आहे. काळ्या गाजराची लागवड करून शेतकरी चांगला नफा कमवू शकतात. तसेच त्याची लागवड करणेही खूप सोपे आहे. कृषी शास्त्रज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, काळ्या रंगाची गाजरे ही जंगली असतात. ज्या शेतात पाण्याचा निचरा करण्याची योग्य व्यवस्था असेल तेथे शेतकरी ही शेती करू शकतात. पुसा, कृष्णा ही त्याची सर्वोत्तम जात आहे. ऑगस्ट ते सप्टेंबर महिन्यात याची लागवड करता येते. ३ ते ४ महिन्यांत पीक तयार होते.

काळे गाजर आरोग्यासाठी फायदेशीर : काळ्या गाजरामध्ये व्हिटॅमिन ए, बी, सी आणि ई मुबलक प्रमाणात आढळते. यासोबतच काळ्या गाजरात लोह, तांबे, पोटॅशियम, फॉस्फरस सारखे घटक आढळतात. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासोबतच ते मधुमेह, उच्च साखरेची पातळी आणि डोळ्यांचे आजार बरे करण्यास देखील मदत करते. काळ्या गाजरांमध्ये फायटोकेमिकल्ससारखे घटकही आढळतात. याचे दररोज सेवन केल्याने तुम्हाला कॅन्सरचा धोका कमी जाणवतो. शरीर निरोगी ठेवण्यासाठी काळे गाजर रोज खावे. भाजीपाला, लोणचे, जाम, कोशिंबीर, ज्यूस, पुडिंग किंवा इतर गोड पदार्थ त्यापासून बनवले जातात. हे कच्चे देखील खाऊ शकता.



# प्लास्टिक आच्छादनामुळे वाढतेय मातीचे प्रदूषण




कॅलिफोर्निया येथील स्ट्रॉबेरी लागवडीत प्लॅस्टिक आच्छादनाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. त्यामुळे मातीमध्ये प्लॅस्टिकच्या सूक्ष्म कणांचे प्रदूषण वाढत असल्याचे वॉशिंग्टन येथील संशोधनातून समोर आले आहे. या प्लॅस्टिक कणांचा जमिनीच्या आरोग्यावर दीर्घकालीन विपरित परिणाम होतो. याविषयी कॅलिफोर्निया पॉलिटेक्निक राज्य विद्यापीठातील पोस्ट डॉक्टरल संशोधक डॉ. एकता तिवारी यांनी ल्योन येथे आयोजित गोल्डश्मिट भू-रसायनशास्त्राच्या परिषदेत त्यांचे संशोधन सादर केले.

आपल्या संशोधनाबाबत माहिती देताना डॉ.तिवारी म्हणाल्या, की या अभ्यासासाठी आम्ही स्ट्रॉबेरी शेताचे सर्वेक्षण करून त्यातून जमिनीच्या वरील पृष्ठभागावरील मातीचे नमुने घेतले. या मातीच्या नमुन्यामध्ये प्रति हेक्टर सुमारे २ लाख १३ हजार ५०० प्लॅस्टिक कण आढळून आले आहेत. या विश्लेषणासाठी इन्फ्रारेड स्पेक्ट्रोस्कोपीचा वापर करण्यात आला. थोड्या अधिक खोलीवरील नमुने घेतले असता त्याही पेक्षा अधिक प्लॅस्टिक कण आढळण्याची शक्यता आहे. कारण दरवर्षी स्ट्रॉबेरी उत्पादनामध्ये आच्छादन म्हणून वापरलेल्या प्लॅस्टिकचे ५ मि.मी. आणि त्या पेक्षा मोठे कण मोठ्या प्रमाणात मातीमध्ये मिसळतात. या कणांचे विघटन होत नसल्यामुळे दशकापेक्षा अधिक काळ तसेच जमिनीत राहतात.प्लॅस्टिकऐवजी सेंद्रिय आच्छादनाला प्राधान्य हवे : प्लॅस्टिक आच्छादनाचे पिकाच्या वाढीवर काही चांगले परिणाम होत असले, तरी त्यापासून होणाऱ्या दीर्घकालीन प्रदूषणामुळे अनेक समस्या उद्भवू शकतात. मातीच्या कणांमध्ये प्लॅस्टिक कणांचे प्रमाण वाढत गेल्यास त्याचा मातीतील ओलावा, सूक्ष्म जिवांच्या श्वसन प्रक्रियेवर विपरित परिणाम होतो. पिकांना उपलब्ध होणाऱ्या नत्राचे प्रमाण कमी होते. मातीमधून प्लॅस्टिकचे छोटे छोटो कण काढण्याचे काम अत्यंत कठीण आणि खर्चिक आहे. एकदा प्लॅस्टिक आच्छादन वापरल्यानंतर अनिश्चित काळासाठी हे कण जमिनीमध्ये पडून राहतात. त्यामुळे भविष्यात आच्छादनासाठी सेंद्रिय घटकांच्या वापरावर भर देणे अत्यंत आवश्यक आहे. सेंद्रिय आच्छादन काही काळानंतर कुजून त्यातून सेंद्रिय कर्बासह अनेक पोषक घटकांची पिकाला उपलब्धता होते. जमिनीचे तापमान नियंत्रित राखले जाते आणि जमिनीतील ओलावा टिकून राहतो. परिणामी पाण्याची बचत होते. वनस्पतीभोवती उपयुक्त सूक्ष्म जिवांची वाढ होऊन सूक्ष्म वातावरण निर्मिती होते. त्यामुळे प्रकाश संश्लेषणाचे क्रिया वेगाने आणि सुरळीत पार पडते. जमिनीची होणारी धूप थांबते, तणांची वाढ होत नाही. पिकाची उत्पादकता, फळांचे उत्पादन आणि दर्जा सुधारण्यास मदत होते.

# अशी घ्या आंबा बागेची काळजी

सध्या सर्वत्र पसरणारे ढगाळ वातावरण आणि काही ठिकाणी झालेला पाऊस ही हवामान स्थिती आंबा पिकाच्या दृष्टीने प्रतिकूल आहे. मुळातच या वर्षी उशिरापर्यंत झालेला पाऊस, पावसाळा संपल्यानंतरही जमिनीत अधिक काळ टिकलेली ओल ही स्थिती होती. त्याला नोव्हेंबरमध्ये पडलेली थोडीफार थंडी पडते न पडते तोच पुन्हा झालेले ढगाळ वातावरण व पावसाळी स्थिती या सर्व हवामान घटकांचा फटका पिकाला बसताना दिसतो.

मोहर जरा बऱ्यापैकी बाहेर पडल्यास ती पाने गळून पडतात. मात्र या प्रक्रियेमध्ये पाने ताकतवान असल्यास मोहर कमकुवत होतो. असा कमकुवत मोहर बाहेर पडल्यानंतर गळून जातो. पानेच शिल्लक राहतात. मोहराला ताकद देण्यासाठी नवतीवर नियंत्रण आणणे गरजेचे असते. त्यासाठी क्लोरमेक्वाट क्लोराइड या वाढ नियंत्रकाची दीड ते दोन मि.लि. प्रति लिटर या प्रमाणे फवारणी घ्यावी. त्यासोबत १३-०-४५ या विद्राव्य खतांची १५ ते २० ग्रॅम प्रति लिटर (दीड ते दोन टक्के) या प्रमाणे फवारणी घेतल्यास फायदा होतो. नोव्हेंबर अखेरपर्यंत संपूर्ण मोहर बाहेर पडणे गरजेचे असते. त्यामुळे एप्रिलमध्येच अन्य फळे बाजारात येण्यापूर्वी फळे काढणीस येतात. आता डिसेंबरचा पहिला आठवडाही संपला असून बागेतील मोहराच्या स्थितीनुसार उपाययोजना करणे गरजेचे आहे. एकदा संपूर्ण मोहर बाहेर पडल्यानंतर थोडेफार ढगाळ किंवा पावसाळी वातावरण चालून जाते. त्यामुळे कमी झालेली थंडी मोहराच्या परागीकरणासाठी फायदेशीर ठरू शकते. ज्या बागांमध्ये सध्या संपूर्ण



मोहर बाहेर पडलेला आहे, अशा ठिकाणी परागीकरण चांगल्या प्रकारे होऊन फळाचा आकार वाढण्यास मदत होईल. फक्त या काळात भुरी रोग व तुडतुड्यासारख्या रसशोषक किडीचा प्रादुर्भाव वाढू शकतो. त्यापासून मोहर आणि पुढील फळ अवस्थांचे संरक्षण करण्यासाठी फवारणीचे नियोजन करावे.

मोहरावरील तुडतुडे नियंत्रणासाठी फवारणी प्रति १० लिटर पाणी थायामेथाक्झाम तीन ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रिड तीन मि.लि. भुरी नियंत्रणासाठी, अॅझोक्सिस्ट्रॉबीन (२३ टक्के एससी) १० मि.लि. किंवा गंधक (पाण्यात विरघळणारे) २५ ग्रॅम. तुडतुडे आणि भुरी यासाठीची ही रसायने एकमेकासोबत वापरता येतात. त्याच्या आठ ते दहा दिवसाच्या अंतर कीटकनाशक आणि बुरशीनाशक बदलून आलटून पालटून दोन फवारण्या घ्याव्यात. आताचे ढगाळ वातावरण जास्त काळ टिकून राहिल्यास, मोहर उमलणाऱ्या बागेमध्ये करपा रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो. या रोगामुळे परागीकरण होऊन फळ सेटिंग होण्याऐवजी संपूर्ण मोहर काळा पडतो. त्यानंतर तो गळून पडतो. करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसत असल्यास कॉपर ऑक्सिक्लोराईड २.५ ते ३ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझीम (१२ टक्के) अधिक मॅन्कोझेब (६३ टक्के) (संयुक्त बुरशीनाशक) दीड ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी घ्यावी.मोहर उमलण्याच्या काळात बागेमध्ये मधमाश्यांचा वावर वाढतो. त्यांच्यामुळे परागीभवन चांगल्या प्रकारे होऊन फळांची सेटिंग होत असते. त्यामुळे मोहर उमलत असलेल्या बागांमध्ये रासायनिक कीटकनाशकांची फवारणी टाळावी. अगदीच गरज भासल्यास किडीचा प्रादुर्भाव नियंत्रणात राहण्यासाठी निंबोळी अर्क (अॅझाडिरॅक्टिन १० हजार पीपीएम) एक ते दीड ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करू शकतात. या वनस्पतिजन्य कीडनाशकामुळे मधमाश्यांवर फारसा परिणाम होणार नाही.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१३९८ : मंगोल साम्राज्याचा सम्राट तैमुर पहिला याने दिल्ली वर हल्ला केला होता.
१७१८ : ग्रेट ब्रिटनने स्पेनविरुद्ध युद्ध पुकारले.
१७७७ : फ्रान्सने अमेरिका या देशाला मान्यता दिली.
१८०३ : इस्ट इंडिया कंपनी ने ओडीसा वर आपला दावा निर्माण केला.
१९०३ : राईट बंधू यांनी पहिल्यांदा ''द फ्लायर'' नावाचे विमान १२ सेकंदांसाठी उडवले होते.
१९२७ : हिन्दुस्तान रिपब्लिकन असोसिएशनचे क्रांतिकारक राजेन्द्र नाथ लाहिरी यांना ब्रिटिश सरकारने निर्धारित तारखेच्या दोन दिवस आधीच गोंडा तुरुंगात फाशी दिले.
१९२८ : भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांनी ब्रिटिश पोलिस ऑफिसर जेम्स सॉंडर्स याची लाहोर येथे हत्या केली.
१९४० : महात्मा गांधीयांनी वैयक्तिक सत्याग्रह चळवळीला स्थगिती दिली.
१९४१ : दुसरे महायुद्ध – जपानी फौजांचे उत्तर बोर्निओ येथे आगमन
१९७० : जयंतीलाल छोटालाल शहा यांनी भारताचे १३ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९७१ : आजच्या दिवशी भारत आणि पाकिस्तान यांचे युद्ध समाप्त झाले.
२००२ : तुर्की ने भारताला काश्मीर मुद्द्यावर समर्थन केले होते.
२००८ : शीला दीक्षित यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.
२०१६ : लेफ्टनंट जनरल बिपीन रावत यांची लष्करप्रमुखपदी आणि एअर चिफ मार्शल बी. एस. धनाओ यांची वायुदलप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली.
२०१६ : विजेंदर सिंग यांनी फ्रान्सिस चेका ला हरवून डब्ल्यूबीओ आशिया पॅसिफिक सुपर मिडलवेट जेतेपद स्वतःकडेच जिकून ठेवले.
२०१६ : आयपीएस ए. के. धस्माना यांची रॉ च्या प्रमुखपदी तर राजीव जैन यांची आयबी च्या प्रमुख पदी निवड करण्यात आली.
२०१६ : शरद पवार यांनी एमसीए (मुंबई क्रिकेट असोसिएशन) च्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५५६ : सम्राट अकबरच्या दरबारातील प्रसिद्ध कवी रहीम यांचा जन्म.
१७७८ : सर हंफ्रे डेव्ही – विद्युत पृथक्करणाद्वारे सोडिअम आणि पोटॅशिअम ही मूलद्रव्ये प्रथमच वेगळी करणारे इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २९ मे १८२९)
१८४९ : लालमोहन घोष – देशभक्त, काँग्रेसचे १६ वे अध्यक्ष, भारताच्या विविध राजकीय हक्कांकरिता त्यांनी इंग्लंडमधील ब्रिटिश जनतेत प्रचार केला. (मृत्यू: १८ आक्टोबर १९०९)
१९०० : मेरी कार्टराइट – इंग्लिश गणितज्ञ (मृत्यू: ३ एप्रिल १९९८)
१९०१ : यशवंत गोपाळ तथा य. गो. जोशी – मराठी लघुकथाकार व 'प्रसाद' मासिकाचे संपादक. 'वहिनीच्या बांगड्या', 'शेवग्याच्या शेंगा' या त्यांच्या कथांवर चित्रपट काढण्यात आले. 'दुधाची घागर' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. (मृत्यू: ७ नोव्हेंबर १९६३)
१९०५ : मुहम्मद हिदायतुल्लाह – भारताचे सहावे उपराष्ट्रपती (२० ऑगस्ट १९७९  २० ऑगस्ट १९८४) आणि अकरावे सरन्यायाधीश (२५ फेब्रुवारी १९६८  १६ डिसेंबर १९७०) (मृत्यू: १८ सप्टेंबर १९९२)
१९११ : डी. डी. रेगे – विलक्षण बोलक्या आणि जिवंत व्यक्तिचित्रणाच्या अत्यंत दुर्मिळ हातोटीमुळे अनेक नामवंतांकडून सन्मानित झालेले चित्रकार व लेखक, लोकसभा व विधानसभेतील अनेक राष्ट्रपुरुषांची चित्रे त्यांनी काढलेली आहेत. (मृत्यू: २ सप्टेंबर १९९९)
१९२४ : गोपालन कस्तुरी – पत्रकार, 'द हिन्दू' चे संपादक (मृत्यू: २१ सप्टेंबर २०१२)
१९४७ : दीपक हळदणकर – दिग्दर्शक व चलचित्रकार
१९७२ : जॉन अब्राहम – अभिनेता व मॉडेल
१९७८ : रितेश देशमुख – अभिनेता.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७४० : चिमाजी अप्पा  पेशवाईतील पराक्रमी सेनापती. त्यांनी पोर्तुगीजांच्या ताब्यातून पश्चिम किनारा मुक्त केला. मोठ्या निकराची झुंज देऊन पोर्तुगीजांच्या ताब्यातील वसईचा किल्ला व साष्टी बेट जिंकून घेतले.
१९०७ : लॉर्ड केल्व्हिन – इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ व गणितज्ञ (जन्म: २६ जून १८२४)
१९२७ : राजेन्द्र नाथ लाहिरी – क्रांतिकारक (जन्म: २३ जून १९०१)
१९३३ : थुब्तेन ग्यात्सो – १३ वे दलाई लामा (जन्म: १२ फेब्रुवारी १८७६)
१९३८ : चारुचंद्र बंदोपाध्याय – बंगाली कथालेखक व कादंबरीकार. 'प्रवासी', 'मॉडर्न', 'रिव्ह्यू' इ. पत्रकांच्या संपादनात त्यांचा वाटा होता. (जन्म: ११ आक्टोबर १८७६  चांचल, माल्डा, बांगला देश)
१९४५ : हिंदी आणि मराठी चित्रपट सृष्टीचे कलाकार विजू खोटे यांचा जन्म.
१९५६ : पं. शंकरराव व्यास – गायक व संगीतशिक्षक, पं. विष्णू दिगंबर पलुसकर यांचे शिष्य (जन्म: २३ जानेवारी १८९८)
१९५९ : डॉ. भोगराजू पट्टाभी सीतारामय्या – स्वातंत्र्यसैनिक, इतिहासकार आणि काँग्रेसचे नेते. काँग्रेसच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त त्यांनी लिहिलेला 'हिस्ट्री ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस' हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. (जन्म: २४ डिसेंबर १८८० गुंडुगोलानू, पश्चिम गोदावरी, आंध्र प्रदेश)
१९६५ : जनरल कोडेन्डेरा सुबय्या तथा के. एस. थिमय्या – भारतीय भूदलाचे ६ वे सरसेनापती, पद्मभूषण, मवावीरचक्र. १९४८ म धे काश्मीरमधील पाकिस्तानी आक्रमकांचा पराभव करणार्या भारतीय सैन्याचे ते प्रमुख होते. (जन्म: ३० मार्च १९०६)
१९८५ : मधुसूदन कालेलकर – नाटककार, कथाकार आणि पटकथाकार (जन्म: २२ मार्च १९२४).






# दहा लाखाचं सोना चांदी लुटल्याप्रकरणी आरोपी १२ तासात पकडला

जालना। प्रतिनिधी

शेवली पोलीस ठाणे येथील जबरी चोरीच्या गुन्हयातील आरोपींचा शोध घेवून गुन्हा उघडकिस करण्याबाबत सेवली पोलीस ठाणे हद्दीतील नेर ते पाहेगाव रोडवरील पोखरी पाटीजवळ दिनांक १४/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा सुमारास फिर्यादी संतोष बळीराम बोंद्रे रा.नेर ता.जि. जालना हे मोटार सायकलने नेर येथुन पाहेगाव मार्गे पाथरूड येथील त्यांचे सोन्याचे दुकानामध्ये जात असतांना यातील आरोपीनी त्यांना मागुन मोटार सायकलवर येवून धडक दिली व खाली पाडले त्यानंतर मागे बसलेल्या आरोपीने त्यांना चाकुने दुखापत करण्याची धमकी देवून फिर्यादीचे जवळ असलेली हिरव्या रंगाची बंग ज्यात १०,५०,०००/- (दहा लाख पन्नास हजार रुपये) रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने असलेली हिसकावून नेली.



अज्ञात आरोपीविरुद्ध सेवली पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १६२/२०२५ भा न्या से कलम ३०९(४),३(५) प्रमाणे दि. १४/१२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता सदर गुन्ह्याचे तपासादरम्यान अमोल इंदल राठोड वय ३५ वर्षे रा. उखळी ता.जि. जालना २) प्रविण विनायक जाधव वय २२ वर्षे रा. राजेगाव ता. माजलगाव जि.बीड ह.मु.उखळो ता.जि.जालना यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे विचारपूस करता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे मान्य केले असून गुन्ह्यात चोरीस गेलेला १०,५०,०००/-(दहा लाख पन्नास हजार रुपये) किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने असा मुद्देमाल बारा तासाच्या आत हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई श्री अजयकुमार बन्सल, पोलीस अधिक्षक , श्री आयुष नोपाणी, अपर पोलीस अधिक्षक , श्री रामेश्वर रेंगे उप-विभागीय पोलीस अधिकारी परतूर उप-विभाग यांचे मार्गदर्शनाखाली योगेश खटकळ सहायक पोलीस निरीक्षक प्रभारी अधिकारी सेवली, पोउनि सलीम शेख, पोह/३१० सुभाष राठोड, पोना २६० पाईकराव, प्रल्हाद चिरफरे, संजय उघडे, विजय जुमडे, पांडुरंग लिंबाळकर, अशोक दुभळकर सर्व नेम. पोलीस ठाणे सेवली आणि ३४६/ खरात, ४२० पाचरणे नेम. मौजपूरी पोलीस ठाणे यांनी केली आहे.

## कोंढूरमध्ये ६५ वर्षीय गावकऱ्याचा धारदार शस्त्राने डोक्यात वार करून खून

### कळमनुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

हिंगोली । प्रतिनिधी

कळमनुरी तालुक्यातील कोंढूर येथे एका ६५ वर्षीय गावकऱ्याचा डोक्यात शस्त्राने वार करून खून केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी मंगळवारी ता. १६ कळमनुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या खूनाचे नेमके कारण स्पष्ट झाले नाही. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह कळमनुरी पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कळमनुरी तालुक्यातील कोंढूर येथे शेषराव पतंगे (६५) त्यांचा मुलगा सखाराम पतंगे हे दोघे राहतात. सोमवारी ता. १५ रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास सखाराम हे गावात आले होते. यावेळी शेषराव हे घरी एकटेच होते. रात्रीच्या सुमारास सखाराम हे घरी गेल्यानंतर त्यांना त्यांचे वडिल शेषराव हे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसून आले. त्यांच्या डोक्यात धारदार शस्त्राचा वार झाल्याचे दिसून आले. त्यांनी वडिलांना उठविण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांचा मृत्यू झाला होता.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, उपाधिक्षक राजकुमार केंद्रे, गुन्हे शाखेचे निरीक्षक मोहन भोसले, पोलिस निरीक्षक प्रेमकुमार माकोडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे, रघुनाथ शेवाळे, उपनिरीक्षक संतोष इंगळे, जमादार गजानन होळकर, सतीष शेळके, गुलाब जाधव यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. पोलिसांनी श्वान पथकालाही पाचारण केले आहे. मात्र घटनास्थळी कोणतीही वस्तू आढळून आली नसल्याने श्वान पथकाला आरोपाचा माग काढता आला नाही. दरम्यान, गावकरी व पोलिसांनी मयत शेषराव यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी कळमनुरी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केला आहे. याप्रकरणी सखाराम पतंगे यांच्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्ती विरुध्द कळमनुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस निरीक्षक माकोडे पुढील तपास करीत आहेत.

## तुकाराम मुंडे यांच्या बदनामी थांबण्यासाठी दिव्यांग संघटनेचा आंदोलन

जालना। प्रतिनिधी

नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात भाजपा आ कृष्णा खोपडे यांनी तुकाराम मुंडे यांना सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी केली होती या मागणीचा निषेधार्थ करून दिव्यांग संघटनेने आंदोलन केले. आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या समर्थनार्थ दिव्यांगांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केलं आहे. नियमाचे व शिस्तच पालन करणारे महाराष्ट्र राज्यातील एकमेव अधिकारी श्री तुकाराम मुंडे येणे नियमाप्रमाणे बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यावर कारवाईचा धडाका सुरू केल्यामुळे याचा राग येऊन काही राजकीय सत्यदरी पुढारी यांनी तुकाराम मुंडे यांना बदनाम करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

नागपूर हिवाळी अधिवेशनात भाजपा आमदार कृष्णा खोपडे यांनी आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे



यांना सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी केली होती. या मागणीनंतर जालन्यातील दिव्यांग संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तुकाराम मुंडे यांच्या समर्थनार्थ आंदोलन केलंय. तुकाराम मुंडे दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे सचिव झाल्यापासून दिव्यांगांचे प्रश्न मार्गी लागले असल्याचं आंदोलनकर्त्यांनी सांगितलं आहे. तसेच, आमदार कृष्णा खोपडे यांनी तुकाराम मुंडे यांची बदनामी करणं थांबवलं नाही, तर दिव्यांग संघटना रस्त्यावर उतरेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.यावेळी प्रहार अपंग क्रांतीचे जिल्हाध्यक्ष मोहन मुंडे , शंकर शिरगुळे दिव्यागचे सामाजिक कार्यकर्ते राहुल मुळे तालुकाध्यक्ष अशोक बरकासे रतन डोंगरे भोकरदन तालुका अध्यक्ष अन्वर भाई सुनिता लोळगे जुमाद चौऊस अर्जुन भोकम राम चव्हाण विलास काबळे शाहरुख शहा रवी तायडे आदींची उपस्थिती होती.

## राष्ट्रीय लोकन्यायालयात पाच महिलेचा संसार जुळला

### तडजोडीने १७ कोटी ४ लाखाचा प्रकरणे निकाली

जालना । प्रतिनिधी

उच्च न्यायालय,महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार आणि न्यायमुर्ती उच्च न्यायालय मुंबई,न्यायमुर्ती उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ,येथील न्यायमुर्ती तथा जालना न्यायीक जिल्ह्याचे पालक न्यायमुर्ती अरूण आर.पेडणेकर ह्यांनी दुरदृश्यप्रणालीव्दारे उपस्थित राहून मार्गदर्शन केले.जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा एम.मोहिते यांच्या उपस्थितीत शनिवार दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी जालना जिल्ह्यातील सर्व न्यायालयात लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते.



दिनांक १३ डिसेंबर रोजी पार पडलेल्या लोकन्यायालयामध्ये प्रलंबित व दावा दाखलपुर्व अशी सुमारे ३९ हजार ८२३ प्रकरणे ठेवण्यात आली होती.त्यापैकी १ हजार १०४ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहे.जिल्ह्यामधील न्यायालयात प्रलंबित प्रकरणापैकी एकूण ५ हजार ७०० प्रकरणे लोकन्यायालयासाठी ठेवण्यात आली होती.यात दिवाणी,फौजदारी,मोटार अपघात,भूसंपादन आणि १३८ एन.आय.ॲक्टच्या प्रकारणांचा समावेश होता.त्यापैकी ५४२ प्रकरणे निकाली निघाली आहे.तर दाखलपुर्व ३४ हजार १२३ प्रकरणांपैकी सुमारे ५६२ प्रकरणे निकाली निघाली आहे. अशी एकुण १ हजार १०४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. लोकन्यालयामध्ये १७ कोटी ४ लाख ७० हजार ५४६ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघालेली आहे. तसेच कौटुंबिक न्यायालयातील प्रलंबित प्रकरणातील लोकन्यायालयामध्ये ठेवण्यात आलेल्या प्रकरणांपैकी ५ परिवारांचा संसार सुखाचा झाला असून पाचही महिला आपल्या पतीच्या घरी नांदण्याकरिता गेल्या आहेत. यावेळी जिल्हा न्यायाधीश एन.एस.शेख,जिल्हा न्यायाधीश आर.बी.पारवेकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश जी.आर.ढेपे, सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नितेश एम.बंडगर आणि मुख्यालयातील सर्व न्यायीक अधिकारी, वकील संघ अध्यक्ष अनिरूध्द बी.घुले यांच्यासह इतरांची उपस्थिती होती

## शेवगाव शहरातील नागरिकांना रेल्वेची प्रतिक्षाच

अहिल्यानगर। प्रतिनिधी

शेवगाव शहरातील नागरिकांना अनेक वर्षापासून शेवगाव हुन रेल्वे जाणार असे सांगितले जाते. पण प्रत्यक्षात कधी रेल्वे जाणार? खासदार निलेश लंके यांनी लोकसभेत रेल्वे मार्गासाठी केंद्र सरकारने तातडीने निर्णय घावा अशी मागणी करावी अशी मागणी आखिल भारतीय ग्राहक पंचायत समितीचे शहर अध्यक्ष रवींद्र शेळके यांनी केली आहे.

श्रीरामपूर, नेवासा, शेवगाव मार्गे बीड ला जाणाऱ्या रेल्वे मार्गा साठी शेवगाव शहर व परिसरातील जमिनी सरकार च्या ताब्यात आहेत. ब्रिटिश काळात हा रेल्वे प्रकल्प मंजूर झाला होता. रेल्वे भरावं टाकण्यात आला होता. त्या नंतर या रेल्वे मार्गासाठी अनेक आंदोलने झाली. उपोषणे झाली. रेल्वे कृती समिती स्थापन झाली. नेवासा तालुक्यातील नागरिकांनी उपोषण केले होते. स्व. मा. खासदार दिलीपजी गांधी यांनी रेल्वे प्रकल्प चालू करावा या साठी पाठपुरावा केला होता. माजी आ. बाळासाहेब मुरकुटे यांनी पाठपुरावा केला. मात्र केंद्र सरकार, रेल्वे खात्याचे मंत्री यांच्या कडून प्रतिसाद मिळत नाही. निवडणुकीत सत्ताधारी पक्षाच्या नेत्या कडून आश्वासन दिले जाते मात्र पूर्तता केली जात नाही. या जमिनी ची विक्री करता येत नाही. मूळ जमीन मालकाला मोबदला देऊन या जमिनी सरकार ने ताब्यात घेतलेल्या आहेत. हा रेल्वे मार्ग झाला तर दळण वळण वाढेल. तालुक्यातील लोकांना रोजगार मिळेल. तालुक्याचा विकास होईल. या योजनेचा सर्व्हे केला जातो. मात्र सर्व्हे झाल्यानंतर या योजनेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आ. मोनिकाताई राजळे, नेवासा मतदार संघांचे आ. विठ्ठलराव लंघे पाटील खासदार निलेश लंके यांनी पक्षीय मतभेद विसरून या रेल्वे मार्ग प्रकल्पा साठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

खासदार निलेश लंके लोकसभा अधिवेशनात शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आवाज उठवत आहेत त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांनी या रेल्वे मार्गासाठी आवाज उठवला तर न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे. नगर बीड परळी रेल्वे मार्गासाठी ना. पंकजाताई मुंडे यांनी आवाज उठवला त्या मुळे हा प्रकल्प मार्गी लागला आहे. मात्र शेवगाव,नेवासा भागातून जाणारा रेल्वे प्रकल्प दुर्लक्षित झाला आहे. या रेल्वे मार्गाची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. या जागेवर कोणताही नवा प्रकल्प उभारण्यात येऊ नये. अशी मागणी रवींद्र शेळके यांनी केली आहे.

## कारमध्ये महिलेला रुग्णालयात नेत असताना अपघात; ३ ठार, २ गंभीर

### वसमत रोडवर राहाटी परिसरात दोन कारची समोरासमोर धडक

परभणी। प्रतिनिधी

छातीत दुखत असल्याने आरळ येथून स्विफ्ट डिझायर कारने महिलेला परभणीला रुग्णालयात नेत असताना वसमत रोडवरील राहटी पाटीजवळ या कारला भरधाव क्रेटा कारने समोरून जोराची धडक दिली. यात तीन ठार, तर दोन जण गंभीर जखमी झाले. हा अपघात परभणी शहरापासून १० किलोमीटर अंतरावर वसमत रस्त्यावरील राहटी परिसरातील विश्वशांती ज्ञानपीठसमोर शनिवारी पहाटेच्या सुमारास झाला. जखमींवर परभणी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी अज्ञात चालकाविरुद्ध ताडकळस पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी सखाराम सटवाजी साखरे यांचे चुलत भाऊ बाबाराव दत्तराव साखरे यांच्याकडे स्विफ्ट डिझायर कार (एमएच ३८ एडी ३५४१)आहे. त्यांच्या घराशेजारी राहणाऱ्या कांताबाई कातोरे यांच्याकडे त्यांच्या पिंगळी येथील नणंद विमलबाई जाधव या भेटण्यासाठी रात्री १०:३० वाजता आरळ येथे आल्या होत्या. त्यांच्या अचानक छातीत दुखत असल्याने त्यांना स्विफ्ट डिझायर कारमध्ये आरळ येथून परभणीच्या दिशेने रुग्णालयात नेत असताना परभणीकडून वसमतकडे जात असलेली क्रेटा कारच्या अपघातात कारचा अक्षरशः चुराडा झाला.

घटनेची माहिती मिळताच ताडकळस पोलिसांचे सहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन मोरे, रणखांब यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणी सखाराम सटवाजी साखरे (रा. आरळ, ता. वसमत) यांच्या फिर्यादीवरून क्रेटा कारच्या (एमएच २२ बीसी७८८८) चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला. (एमएच २२ बीसी ७८८८)चालकाने निष्काळजीपणे आणि भरधाव कार चालवून समोरून जोरदार धडक दिली. अपघातानंतर क्रेटा कारचा चालक अंधाराचा फायदा घेत पसार झाला. या अपघातात फिर्यादीचा चुलत भाऊबाबाराव दतराव साखरे (रा.आरळ, ता. वसमत), विमलबाई बालासाहेब जाधव (रा. पिंगळी,ता. परभणी) आणि कांताबाई अंबादास कातोरे (रा. आरळ, ता.वसमत) हे जागीच ठार झाले. त्यांच्या सोबतचे साईनाथ रामचंद्र काकडे (रा. आरळ, ता. वसमत) आणि हरी बालासाहेब जाधव (रा.पिंगळी, ता. परभणी) हे दोघे गंभीर जखमी झाले. अपघात घडला त्या वेळी मी व्यवसायाच्या ठिकाणांहून घरी जात होतो. हा अपघात माझ्या डोळ्यासमोर झाला. मी त्वरित पोलिसांना भ्रमणध्वनीद्वारे कळवले. मी अपघातात जखमींना वाचवण्यासाठी आजूबाजूच्या गावातील माझ्यामित्रांना फोन करून बोलावून घेतले.

## अहिल्यानगरात चोरीसाठी चौघी बुरखा घालून घुसल्या घरात

अहिल्यानगर। प्रतिनिधी

बोल्हेगाव येथील दिव्यांग महिलेच्या खुनाचे रहस्य तीन दिवसांनी उलगडले. दागिने चोरण्याच्या उद्देशाने घरात घुसलेल्या चौघींनी चोरीला विरोध करणाऱ्या महिलेचा गळा चिरून खून केल्याचे समोर आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोघा अल्पवयीन मुलींसह चार युवतींना अटक केली आहे. १२ डिसेंबर रोजी ही घटना ही घटना घडली होती.

दिव्या अंकुश देशमुख ऊर्फ दिव्या विजय खाडे(वय २०, रा. भारत बेकरीमागे, बोल्हेगाव),अंजुम ऊर्फ मेहक अहमद सैफी (वय २२, रा.मोरया पार्क, बोल्हेगाव, मूळ रा. चांद बाग,करावल नगर, नॉर्थ इस्ट दिल्ली) व १६ वर्षीय दोन अल्पवयीन मुली अशा चार जणींना अटक करण्यात आली. मयत मनिषा बाळासाहेब शिंदे (वय ४०, बोल्हेगाव) या घरात एकट्या असताना त्यांची गळा चिरून हत्या करण्यात आली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तपास करत असताना त्यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून व गोपनीय माहिती मिळवून आरोपींची ओळख पटवली व त्यांना ताब्यात घेतले. आरोपी दिव्या हिचे माहेर मयत महिलेचे शेजारी आहे. मयत महिलेकडे असलेल्या दागिन्यांची तिला माहिती होती. तिने इतर तिघींना बरोबर घेऊन दागिने चोरण्याचा कट रचला होता. चौघांनी महिलेचे चोरलेले दागिने त्यांनी एका व्यक्तीच्या नावे एका बँकेत तारण ठेवून त्यावर ९२ हजार रुपये कर्ज काढले.ज्या व्यक्तीच्या नावावर कर्ज काढले त्याला १२ हजार दिले व उर्वरित ८० हजार रुपये दोघींनी निम्मे निम्मे वाटून घेतल्याचे समोर आले आहे. हे दागिने हस्तगत करण्यासाठी व ज्याच्या नावावर दागिने ठेवण्यात आले, त्याचा गुन्ह्यात सहभाग आहे की नाही, याचा शोध पोलिस घेत आहेत. आरोपी व खुनाचे कारण शोधण्यासाठी पोलिसांकडून सर्व शक्यता तपासल्या जात होत्या. मयत महिलेच्या घरासमोरील सीसीटीव्हीमध्ये एका बाजूने काही महिला चालत जाताना दिसल्या होत्या. मात्र,परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासताना एका ठिकाणी चौघी पळताना आढळल्याने त्यांच्यावर संशय बळावला. त्या जात असलेल्या रस्त्यावरील इतर सीसीटीव्ही तपासल्यावर त्यांची ओळख पटली.

# प्रोफेसर चौकात छत्रपती संभाजी महाराजांचा भव्य पुतळा अनावरण-आ.संग्राम जगताप

अहिल्यानगर। प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या काळात स्वराज्यावर आक्रमण करणारे त्या वेळचे दहशतवादीच होते. आजही देशावर हल्ला करणारे दहशतवादी औरंग्याच्या अवलादी आहेत. हिंदुत्वाची व स्वराज्याची कास धरून आपणही ही दहशतवादी जिहादी वळवळ बंद करण्यासाठी संघर्ष करू. छत्रपती संभाजी महाराजांचे स्वराज्याचे कार्य पुढे नेऊ, असे आवाहन आमदार संग्राम जगताप यांनी सोमवारी केले.

प्रोफेसर कॉलनी चौकात महापालिकेने उभारलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याचे प्राथमिक अनावरण सोमवारी दुपारी आ. जगताप यांनी केले. त्या वेळी ते बोलत होते. महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, शिवसेना जिल्हाप्रमुख आदिल शिंदे, माजी उपमहापौर गणेश भोसले, पुतळा कृती समितीचे अजिंक्य बोरकर, सतीश बारस्कर, मराठा महासंघाचे सुरेश इथापे, जिजाऊ ब्रिगेडच्या स्वाती जाधव यांच्यासह माजी नगरसेवक तसेच मोठ्या संख्यने नागरिक व महायुतीतील घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी उपस्थितांनी ढोल ताशांच्या गजरात छत्रपतींचा जयजयकार केला.आ. जगताप म्हणाले, की शहरात छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा अनावरण हा सुवर्णाक्षरांनी लिहिण्याचा दिवस आहे. हा सोहळा प्राथमिक अनावरण सोहळा आहे, मंगळवारी, १६ डिसेंबरला ठरल्याप्रमाणे सकल मराठा व सकल शिवप्रेमींच्या वतीने दिमाखदार सोहळ्याने या पुतळ्याचे लोकार्पण होणार आहे. धर्मरक्षक संभाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी अनेकांनी संघर्ष केला. आंदोलन केले राजू ससे यांनी उपोषण केले. २००७ मध्ये तत्कालीन नगरसेवक कैलास गिरवले यांनी महापालिकेत ठराव केला. शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीनेही वेळोवेळी मागणी केली गेली. आता सर्वांची इच्छा व स्वप्न पूर्ण झाले आहे. पुतळा उभा राहिल्याने प्रत्येकाला आनंद झाला आहे नगर शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती संभाजी महाराज यांचे पूर्णाकृती पुतळे उभारले. आता लवकरच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यांचे काम सुरू करू. पुतळे हे प्रेरणा देणारे व शहराची ओळख निर्माण करणारी स्मारके आहेत. या पुतळ्यांमुळे शहराच्या वैभवात भरच पडली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळा उभारणीसाठी ज्यांनी ज्यांनी संघर्ष केला त्या सर्वांचे आभार मानतो. वेळोवेळी पालिकेच्या आयुक्तांनी व अधिकाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही आभार मानतो, अशा शब्दांत आ. जगताप यांनी कृतज्ञता व्यक्त केली. सुरेश इथापे यांनी स्वागत केले. अनिल मोहिते, गणेश कवडे, ज्योती जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. अजिंक्य बोरकर यांनी आभार मानले. उद्धव कालापहाड यांनी सूत्रसंचालन केले. जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली



जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/६४१
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २८/१०/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : सय्यद अजमत सय्यद शौकत सर्व्हे नं. ८४ सहन ३ नं.प.मि.नं.१८-७२-३ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-७२-३) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम डिपी आरक्षीत जागा
दक्षिण- शेख अजमत शेख ताहेर यांचा प्लॉट
उत्तरः प्लॉट नं. २

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# वडवणी तहसील कार्यालयात अधिकाऱ्यांची दांडी यात्रा

## सकाळचे साडेदहा वाजूनही कार्यालय ओस; गोरगरीब जनतेचा संताप अनावर

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्याच्या कारभाराचे केंद्र असलेल्या तहसील कार्यालय वडवणी येथे आज सकाळी प्रशासनाचा ढिसाळ आणि बेजबाबदार चेहरा उघड झाला. सकाळचे साडेदहा वाजूनही एकही जबाबदार अधिकारी किंवा कर्मचारी कामावर हजर नसल्याने संपूर्ण कार्यालयात शुकशुकाट पसरला होता. टेबल-खुर्च्या रिकाम्या, फाईली धुळ खात पडलेल्या आणि कामकाज पूर्णतः ठप्प – हे चित्र पाहून नागरिक संतप्त झाले.




शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी, उत्पन्न-जात प्रमाणपत्र, शिधापत्रिका, पेन्शन, नैसर्गिक आपत्ती मदत, जमिनीचे प्रश्न यासाठी गोरगरीब, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक दूरदूरच्या गावांतून येतात. मात्र येथे पोहोचल्यावर त्यांना मिळते ते फक्त फेऱ्या, वेळेचा अपव्यय आणि अपमानास्पद वागणूक. अधिकाऱ्यांची वेळ मात्र जनतेपेक्षा मौल्यवान आहे का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

नियम, वेळ आणि शिस्त फक्त सामान्य नागरिकांसाठीच आहेत का?

कार्यालयीन वेळ सकाळी स्पष्टपणे ठरवलेली असताना अधिकाऱ्यांची ही दांडी यात्रा कोणाच्या मर्जीने सुरू आहे? वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण आहे की नाही, असा प्रश्नही यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.तहसील कार्यालय म्हणजे जनतेसाठी न्याय आणि मदतीचे केंद्र; मात्र वडवणीत हेच कार्यालय जनतेसाठी छळछावणी बनत चालल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. याआधीही कामकाजाबाबत अनेक तक्रारी करूनही प्रशासनाने डोळेझाक केल्याने अधिकाऱ्यांचे मनोबल वाढले असून ते खुलेआम नियम धाब्यावर बसवत आहेत.या गंभीर प्रकाराकडे जिल्हाधिकारी व महसूल विभागाने तात्काळ दखल घेऊन जबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अन्यथा नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे. जनतेचा संयम आता संपत चालला असून प्रशासनाने वेळीच जागे न झाल्यास त्याची जबाबदारी पूर्णतः शासनाची असेल.

# पोलीस पाटील रिक्त पदे आरक्षण सोडत १९ डिसेंबरला

बीड । प्रतिनिधी

परळी वै उपविभागातील पोलीस पाटील पदाची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने गावनिहाय आरक्षण निश्चितीबाबत जिल्हांदडाधिकारी बीड यांनी दि. १४.१२.२०२५ हे आदेश निर्गमित केलेले आहे. सदर रिक्त पदे भरण्यासंदर्भात पोलीस पाटील रिक्त पदाचे प्रवर्गनिहाय समांतर आरक्षण घोषित करण्यात येणार आहे.

जिल्हादंडाधिकारी बीड यांचे दि. १४.१२.२०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार पोलीस पाटील भरती प्रक्रियेचे अनुषंगाने गावनिहाय आरक्षण निश्चितीबाबत खालील प्रमाणे वेळापत्रक ठरवुन देण्यात आलेले आहे.भरती प्रक्रियेचे टप्पे:- १५ ते २० डिसेंबर २०२५ जाहिर नोटीस प्रसिध्द करणे व गावनिहाय आरक्षण निशित करणे. दि. २२ डिसेंबर २०२५ ते २६ डिसेंबर २०२५ आरक्षणावर अक्षेप. ३० डिसेंबर २०२५ प्राप्त आक्षेपावर निर्णय घेऊन गावनिहाय अंतिम आरक्षण जाहिर करणे वेळापत्रकाच्या अनुषंगाने पोलीस पाटील रिक्त पदे आरक्षणाची सोडत काढून निश्चित करावयाची आहे. त्याकरीता दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ०१.०० वाजता मध्यवर्ती प्रशासकीय इमारत तहसील कार्यालय परळी वै येथे सभा आयोजित केलेली आहे. तरी इच्छुक नागरिकांनी आरक्षण सोडत काढण्याकरीता हजर राहावे. आरक्षण निश्चित झाल्यानंतर आक्षेप किंवा हरकत विचारात घेण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.असे परळी वैद्यनाथचे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# पाटोद्याच्या आठवडी बाजारात चोरांचा सुळसुळाट

## महिलांच्या मंगळसूत्रांसह मोबाईलची चोरी; पोलिसांच्या दुर्लक्षामुळे नागरिकांत संताप

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील आठवडी बाजारात सध्या चोरट्यांनी अक्षरशः सुळस् केला असून महिलांच्या मंगळसूत्र लहान मुलांच्या गळ्यातील सोन्या ताईत व मोबाईल चोरीच्या घटनांत व झाली आहे. या प्रकारांबाबत पाटो पोलिसांकडून आवश्यक ती खबरदा घेतली जात नसल्याने तालुक्यातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



पाटोदा हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून दर गुरुवारी येथे मोठ्या प्रमाणात आठवडी बाजार भरतो. तालुक्यातील शेकडो नागरिक शासकीय कामकाजासह बाजारासाठी येथे येत असतात. ...ड-अहिल्यानगर तसेच सौतडा घाट ... काम सुरू असल्यामुळे पाटोदा ...रातील राजमोहम्मद चौक ते साकत ...र्गावर वाहनांची मोठी गर्दी होत आहे. ...तच नवीन पुलावर व रस्त्यालगत ...पाऱ्यांनी दुकाने थाटल्याने बाजारात ...ठी कोंडी निर्माण होत आहे. या ...र्दीचा फायदा घेत चोरट्यांकडून ...हेलांचे मंगळसूत्र, लहान मुलांच्या ...ळ्यातील सोन्याच्या ताईत तसेच मोबाईलची चोरी केली जात आहे. मात्र या संवेदनशील ठिकाणी पोलिसांचा ठोस बंदोबस्त दिसून येत नसल्याने पोलिसांचे अक्षम्य दुर्लक्ष असल्याचे चित्र आहे. दरम्यान, पाटोदा एसटी बसस्थानक परिसरातही चोरीच्या घटनांत वाढ झाली आहे. ग्रामीण भागातून ये-जा करणाऱ्या अंगणवाडी सेविका, आशा वर्कर तसेच नोकरीनिमित्त प्रवास करणाऱ्या नागरिकांना बसमध्ये चढताना व उतरताना चोरट्यांकडून ढकलाढकली करून चोरी केल्याच्या घटना घडत आहेत.या वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आठवडी बाजार व एसटी स्टँड परिसरात तातडीने पोलीस बंदोबस्त वाढवावा, अशी जोरदार मागणी पाटोदा शहरवासीयांकडून होत आहे.

# गेवराई पोलीसांनी केले दोघा मंगळसूत्र चोरांना अटक; दोन लाखाचा ऐवज हस्तगत

बीड । प्रतिनिधी

गेवराई- संभाजीनगर रस्त्यावर तिघांनी दोन प्रवाशांना अडवून महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी केले होते. या प्रकरणातील दोन आरोपींना गेवराई पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून दोन लाखाचा चोरीचा माल हस्तगत केला.

दिनांक २३/१०/२०२५ रोजी फिर्यादीने फिर्याद दिली की, फिर्यादी, फिर्यादीची पत्नी व मुलगा असे त्यांच्या होंडा शाईन मोटार सायकलवर छत्रपती संभाजीनगर येथून बीडकडे येत असतांना सायंकाळी ०७.१० वा. चे सुमारास ते पाचोड टोलनाका पास केल्यानंतर एक बजाज कंपनीची काळ्या रंगाची पल्सर मोटार सायकलने पाठलाग केला.



त्यांचा संशय आल्याने त्यांनी जालना फाटा येथे थांबून नाष्टा करून पुन्हा बीडकडे निघाले असता राक्षसभूवन फाट्याच्या पुढे आल्यानंतर मोटार सायकलवरील तिघांनी त्यांना थांबवून फिर्यादीच्या पत्नीच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाचे मणीमंगळसूत्र चोरून घेऊन गेले वगैरे फिर्यादीवरून सदरचा गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्याचा तपासात गुप्त बातमीदार नेमूण व तांत्रीक तपासणी करून आरोपी १) कुलदीप

◀◀ पान ३ वर

# पाटोदा मार्केट कमिटीतील मुख्य रस्त्याची अवस्था बिकट, शेतकरी-व्यापाऱ्यांना मोठा त्रास

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा मार्केट कमिटी परिसरातील मुख्य रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून याचा थेट फटका शेतकरी व व्यापाऱ्यांना बसत आहे. सध्या मार्केट कमिटीमध्ये सोयाबीनची मोठ्या प्रमाणावर आवक सुरू असून खरेदी केंद्रही कार्यरत आहेत. तसेच वजन काटा सुरू झाल्याने दररोज शेकडो शेतकरी, वाहने व व्यापारी ये-जा करत आहेत.

मात्र, मार्केट कमिटी स्थापन झाल्यापासून आजपर्यंत परिसरात एकही दर्जेदार रस्ता तयार करण्यात आलेला नाही. मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खडी वर आली असून



चिखल, धूळ आणि खड्ड्यांमुळे वाहनांची ये-जा अडथळ्याची ठरत आहे. अवजड वाहनांना मोठी कसरत करावी लागत असून अपघाताचीही भीती व्यक्त केली जात आहे.मार्केट कमिटी परिसरात व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात गाळे घेतले आहेत, तर काही ठिकाणी बांधकामही सुरू आहे. तरीसुद्धा मूलभूत सुविधा असलेल्या रस्त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष कायम आहे. रस्त्याच्या अभावामुळे मालाची वाहतूक वेळेत होत नसून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. या गंभीर समस्येकडे संबंधित विभाग, बाजार समिती प्रशासन व लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष देऊन मुख्य रस्त्याचे डांबरीकरण व कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी व व्यापाऱ्यांकडून जोर धरू लागली आहे. अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही यावेळी व्यक्त करण्यात येत आहे.

# नैसर्गिक शेती काळाची गरज – कृषिअधिकारी

माजलगाव । प्रतिनिधी

प्रकल्प संचालक आत्मा बीड सुभाष साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान राबविले जात असून त्या अंतर्गत तालुक्यात नऊ शेतकरी गट तयार करण्यात आले असून दि १५ डिसेंबर रोजी मंगरूळ येथे तालुका कृषी अधिकारी कार्यालय माजलगाव अंतर्गत गटातील शेतकऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित केले होते.यामध्ये उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना रासायनिक खत व कीडनाशकाच्या अति वापरामुळे जमीन,पशुपक्षी व मानवाचे आरोग्य धोक्यात आले असून ते अबाधित ठेवण्यासाठी नैसर्गिक पद्धतीने शेती करून आपल्या कुटुंबाचे व मानवाचे आरोग्य अबाधित ठेवणे गरजेची आहे असे संबोधित केले यावेळी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेले प्रगतशील शेतकरी अण्णासाहेब जगताप यांनी नैसर्गिक शेतीसाठी लागणाऱ्या विविध निविष्ठा कशाप्रकारे तयार करायच्या व त्याचा वापर करण्याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. उपकृषी अधिकारी गौरव बापमारे यांनी शून्य मशागत तंत्रज्ञान

◀◀ पान ३ वर

# बारामती येथील तरुणीवर अंबाजोगाईत सामूहिक अत्याचार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बारामती तालुक्यातील कनेरी येथील एका तरुणीला आंबा सहकारी साखर कारखाना परिसरात असलेल्या कला केंद्रावर पाठवण्यात आले होते मात्र सदर तरुणीने या ठिकाणी राहण्यास नकार दिल्यानंतर तेथीलच एका महिलेने परपुरुषाच्या स्वाधीन केल्यानंतर तिच्यावर तिघांनी अत्याचार केला अंबाजोगाई पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली नाही मात्र बारामती पोलिसांमध्ये दाखल झाल्यानंतर अंबाजोगाई पोलिसांनी तिघाजणाविरुद्ध लैंगिक शाळा चा गुन्हा दाखल केला आहे.



या घटनेची हकीगत अशी की एप्रिल २५ मध्ये कनेरी तालुका बारामती येथील एका मुलीस अंबाजोगाई पासून जवळच असलेल्या आंबा साखर कारखाना परिसरातील पायल कला केंद्र येथे पाठवण्यात आले होते तेथील बदामबाई गोकुळे हिने या मुलीस नृत्य शिकवण्याचे प्रशिक्षण देते मात्र सदर तरुणीने या काला केंद्रावर राहण्यास नकार दिला त्यामुळे तिला मारहाण झाली त्यानंतर तिने दुसऱ्याच्या स्वाधीन केल्यानंतर तिघा जणांनी तिला लॉजवर नेऊन तिच्यावर अत्याचार केला व नंतर पायल कला केंद्र येथे आणून सोडले सदर पीडितेने तिच्या आईला सर्व हकीगत सांगितली अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये तक्रार देण्याचा प्रयत्न केला मात्र ती स्वीकारली न गेल्याने पुन्हा या तरुणीने बारामती मध्ये आपल्या आई सहजावून तक्रार दाखल केल्यानंतर तिथून अंबाजोगाई पोलिसाकडे हा गुन्हा वर्ग करण्यात आला अंबाजोगाई पोलिसांनी बदामबाही गोकुळी हिच्यासह मनोज कालिया प्रमोद गायकवाड व अन्य एक अज्ञात यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे

# जरूडकरांची हाक 'आम्ही येतो;तुम्हीही या' शेतकरी हक्क मोर्चाच्या बैठकीस उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या कापूस व सोयाबीन पिकांना रास्त हमीभाव मिळावा, या प्रमुख मागणीसाठी दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या *''शेतकरी हक्क मोर्चा''*च्या जनजागृतीसाठी मौजे जरूड येथे शेतकरी बैठक उत्साहात पार पडली.

या बैठकीत उपस्थित शेतकऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना हाक देत, ''आम्ही मोर्चासाठी येत आहोत, तुम्हीही या'' असे आवाहन केले.



शेतकऱ्यांचा हा हक्काचा लढा अधिक व्यापक करून शेतकरी एकजूट दाखवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

बैठकीसाठी बीड येथून शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोकराव येडे व सुहास जायभाय यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. याला प्रतिसाद देत शेतकऱ्यांनी मोर्चात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचा विश्वास दिला.

या वेळी गणेश काकडे,रामकिसन काकडे, रामकिसन काकडे, ईश्वर काकडे, बाळू नाना काकडे ,गणेश काकडे, सुंदरराव काकडे ,प्रताप काकडे, कोंडीराम काकडे ,सचिन शहामाने, विशाल मुळे, विक्रम काकडे ,रंजीत काकडे, वशिष्ठ काकडे, सचिन काकडे ,विठ्ठल जाधव ,अशोक काकडे, राजेश काकडे, विलास काकडे, नंदकुमार काकडे, रामेश्वर काळे, कल्याण काकडे, ज्ञानोबा काकडे पुत्र, शेतकरी मित्र व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी संघर्ष,आव्हाने ही संधी म्हणून स्विकारले –गायकवाड

आष्टी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील राजकारणाला वेगळी दिशा देण्याचे श्रेय लोकनेते मुंडेसाहेबांना जाते.लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी संघर्ष,आव्हाने ही संधी म्हणून स्विकारले आणि इतिहास घडवला असे प्रतिपादन कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा सरपंच परिवंत गायकवाड यांनी क-हेवडगाव येथे बोलताना केले.

भाजप नेते दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडेसाहेब यांची १२ डिसेंबर रोजी ७६ वी.जयंती लोकनेते आ.सुरेश ( अण्णा ) धस यांच्या मार्गदर्शनाखाली जयंती साजरी क कऱ्हेवडगाव येथे सामाजिक, शैक्षणिक कार्यक्रमाने जयंती संपन्न झाली. कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा सरपंच परिवंत गायकवाड यांच्यावतीने कऱ्हेवडगाव येथे जि.प.शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप करून जयंती साजरी केली.



यावेळी सरपंच परिवंत गायकवाड, कांतिलाल सांगळे, बळीराम खाडवे, हानुमान गायकवाड, अमर शेख, महेश सांगळे,गणेश टकले, आत्माराम नागरगोजे,उत्तम नागरगोजे, हरी टकले,कृष्णा जाधव,लतिका शेख,शरद खांडवे, जालिंदर खाडवे भगवान सांगळे, जालीधर नागरगोजे, केशवराव बांगर, बंडू बांगर,सलवार शेख, किरण गायकवाड, शिक्षक वाघमारे, पवार सर,

◀◀ पान ३ वर

# बाबुराव पोटभरे यांच्या फार्म हाऊसवर चोरी

## महिलेच्या गळ्यातील ७ ग्राम सोने व शेळी चोरट्यांनी लंपास केली

माजलगाव । प्रतिनिधी

बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांच्या (कल्याण नगर) पाथरी हायवेवर असणाऱ्या फार्महाऊस वर अज्ञात चोरट्यांनी चोरी केली.यावेळी चोरट्यांनी शेतात असणाऱ्या वृद्ध जोडपेला जीवे मारण्याची धमकी देत महिलेच्या गळ्यातील व कानातील सात ग्राम सोने व शेळी अज्ञात चोरट्यांनी लंपास केली.

याबाबत समजलेली माहिती अशी की, शहरापासून चार-पाच किलोमीटर अंतरावर राष्ट्रीय महामार्ग बाबुराव पोटभर यांचे फार्म हाऊस आहे.शेतातील सालगडीअंकुश मसाजी जाधव (वय ६५ वर्षे) व विमल अंकुश जाधव (वय ५७ वर्षे) दांपत्य शेतातच राहतात. दि १४ डिसेंबर रविवारी रात्री १२:३० वाजण्याच्या दरम्यान शेतात अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करून दांम्पत्याच्या गळ्याला फरशी कुऱ्हाड लावत महिलेच्या गळ्यातील सोन्याचे चार ग्रॅमचे मंगळसूत्र,तीन ग्रॅमचे कानातील झुंबर,त्याचप्रमाणे गोट्यातील शेळी चोरून नेली. यावेळी चोरट्यांनी जाधवच्या तोंड दाबुन जीवे मारण्याची धमकी दिली.या प्रकरणी जाधव यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्याविरोधात ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. असून अधिक तपास पोलीस निरीक्षक बालक कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे.

# कुंभार समाजाच्या उन्नतीसाठी कटिबद्ध-आ.सुरेश धस

## कर्नाटकातून उच्च दर्जाची माती आणून प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणार

आष्टी । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील छोट्या घटकांचा आणि पारंपारिक कारागिरांचा विचार करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजना आखल्या आहेत. याच धर्तीवर कुंभार समाजाच्या हाताला काम आणि कलेला वाव मिळावा, यासाठी भविष्यात कर्नाटकातून चांगल्या दर्जाची माती उपलब्ध करून दिली जाईल. प्रगत



प्रशिक्षणाची सोय केली जाईल असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले.

खादी व ग्रामोद्योग आयोग,महाराष्ट्र राज्य कार्यालय (मुंबई) आणि केंद्रीय सुक्ष्म,लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ग्रामोद्योग विकास योजने' अंतर्गत आष्टी येथे 'कुंभार सशक्तीकरण कार्यक्रम' पार पडला. या कार्यक्रमाच्या सांगता समारंभात आ.सुरेश धस बोलत होते.यावेळी २० लाभार्थ्यांना विद्युत कुंभार चाकांचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र कुंभार महासंघाचे अध्यक्ष विनायक राऊत, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोडे,माजी नगरसेवक रावसाहेब देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

दि. ६ डिसेंबर ते १५ डिसेंबर २०२५ या कालावधीत स्कील डेव्हलपमेंट फौंडेशन आणि प्रोफेशनल ट्रेनिंग असोसिएट यांच्या मार्फत हे प्रशिक्षण शिबीर राबवण्यात आले.प्रशिक्षक स्वप्निल

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पिंपरीत भाजप विरोधात सर्वपक्षीय एकवटणार, मनसे-काँग्रेस एकत्र, अजित पवारांनाही निमंत्रण धाडलं

**पिंपरी । प्रतिनिधी**

काँग्रेस आणि मनसेचे सुत जुळत नसले तरी पिंपरी चिंचवडमध्ये मात्र काँग्रेस आणि मनसेने सोबत येण्याचा निर्णय घेतला आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये महाविकास आघाडीची बैठक घेण्यात आली, यात मनसेचे नेतेही सहभागी झाले होते. शिवाय महादेव जानकरांच्या रासपचेही नेते उपस्थित होते. विशेष म्हणजे अजित पवारांची राष्ट्रवादी आमच्या आघाडीत आली तरी आमची हरकत नाही, असं म्हणत या सर्व पक्षीयांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीलाही मविआत येण्याचं आमंत्रण धाडलं आहे. एकंदरीत पिंपरीत भाजपच्या विरोधात सर्वपक्षीयांनी मोट बांधण्याची तयारी सुरू केल्याचं चित्र आहे.




महापालिका निवडणुकीचं बिगुल वाजलं आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी चिंचवडमध्ये स्वबळाचा नारा दिला. याला काही तास उलटले न उलटले, पिंपरी चिंचवड शहरात पवार काका-पुतणे एकत्र येण्याच्या दृष्टीने पुढचं पाऊल पडल्याचं चित्र आहे.

राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे निवडणूक प्रमुख नाना काटे आणि शरद पवार राष्ट्रवादीच्या निवडणूक कोअर कमिटीचे सदस्य सुनील गव्हाणे या दोघांची बैठक पार पडली. दोन्ही राष्ट्रवादीची एकत्रितरित्या अशी पहिल्यांदाच चर्चा झाली. यावेळी सुप्रिया ताईंचा मला काही दिवसांपूर्वी फोन आला होता, तेव्हा त्यांनी पिंपरी चिंचवडमध्ये मतविभाजन न करण्याचा अन् शरद पवार गटाच्या स्थानिकांशी चर्चा करण्याचा सल्ला दिला असा दावा नाना काटे यांनी केला. काटे आणि गव्हाणे यांनी अजितदादा आणि सुप्रियाताईंसह वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करतच ही बैठक घेतल्याचं स्पष्ट केलं.

या चर्चेत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे तुतारीच्या चिन्हावर उमेदवार उभे करायचे की फक्त घड्याळ चिन्हावर लढायचं? केवळ दोन्ही राष्ट्रवादीची आघाडी करायची की एकनाथ शिंदे शिवसेनेला सोबत घ्यायचं? भाजप विरोधी लढण्यासाठी यातील कोणतं समीकरण अंतिम करायचं? यावर दोन्ही राष्ट्रवादीने ही पहिल्यांदाच एकत्रितरित्या चर्चा केली. मैत्रीपूर्व लढत करावी अस सांगितल्यावर पिंपरी चिंचवडच्या भाजपच्या नगरसेवक आणि ठाकरे गटाच्या नगरसेवक आणि कार्यकर्त्यांनी थेट अजित पवारांकडे आपला मोर्चा वळवला आहे. भाजपने कामं केली नाहीत, त्यांनी दबाव टाकून मागील काही वर्षे कामं करू दिली नाहीत असा थेट आरोप भाजपच्या कार्यकर्त्यांनी केला.

भाजपच्या माजी नगरसेवक अश्विनी जाधव यांनी दादांच्या राष्ट्रवादीत प्रवेश घेतला आहे. तर भाजपने कामच केलं नाही, कोणता विकास केला नाही असा आरोप करत ठाकरे गटाचे कार्यकर्ते आणि माजी नगरसेवकांनीही राष्ट्रवादीत प्रवेश केला. महिला शहर प्रमुख रूपाली अल्हाट, योगेश बोऱ्हाटे, संदीप अल्हाट, संगमेश वलांडे आणि इतरांनी प्रवेश केला. सोबतच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या तर फायदा होईल असं नवीन प्रवेश घेतलेल्या कार्यकर्त्यांचं मत आहे.

# ग्रामीण शिक्षण व्यवस्थापनाला राष्ट्रीय मानांकन ; विरसिंह रणसिंग यांना 'स्टार एज्युकेशन अवॉर्ड-२०२५'

**इंदापूर । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील शैक्षणिक व्यवस्थापनाला नवी दिशा देणाऱ्या इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान, निमसाखर (ता. इंदापूर) या संस्थेचे सचिव विरसिंह विश्वासराव रणसिंग यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'स्टार एज्युकेशन अवॉर्ड-२०२५' ने गौरविण्यात आले. महाविद्यालयातील सर्वोत्तम व्यवस्थापन प्रणाली या कॅटेगरीमध्ये हा मानाचा पुरस्कार नेस्को, गोरेगाव (मुंबई) येथे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



शैक्षणिक कार्यातील सातत्य, प्रभावी नेतृत्व, उत्कृष्ट व्यवस्थापन कौशल्य आणि गुणवत्तेचा ध्यास या गुणांची दखल घेत रणसिंग यांचा हा सन्मान करण्यात आला आहे. शिक्षणासोबतच सामाजिक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग व सहकार्य देणाऱ्या त्यांच्या कार्यामुळे परिसरात समाधान व अभिनंदनाचा सूर आहे.

स्टार एज्युकेशन अवॉर्ड्सच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण व अग्रगण्य उपक्रम राबविणाऱ्या शैक्षणिक संस्था व संघटनांचा गौरव करण्यात येतो. अध्यापन प्रक्रियेचा पुनर्विचार, पुनर्परिभाषा करून विद्यार्थ्यांना भविष्यासाठी सक्षम करणाऱ्या उपक्रमांना या पुरस्कारांद्वारे प्रोत्साहन दिले जाते, अशी माहिती रणसिंग यांनी दिली. नवोपक्रम, संधींची निर्मिती आणि दर्जेदार शिक्षणाच्या सर्वोच्च मानकांचे पालन करणाऱ्या इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान या ग्रामीण भागातील संस्थेच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन हा राष्ट्रीय सन्मान मिळाल्याने आगामी काळात अधिक जोमाने शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत राहण्याचा निर्धार रणसिंग यांनी व्यक्त केला. या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष आनंदी रणसिंग, उपाध्यक्ष प्रकाश कदम, खजिनदार विरबाला पाटील, विश्वस्त शंकरराव रणसिंग, कुलदीप हेगडे, राही रणसिंग, विश्वासराव रणसिंग, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळंगे, उपप्राचार्य ज्ञानेश्वर गुळीग, डॉ. प्रशांत शिंदे, तावशी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक महादेव बागल, म्हसोबाचीवाडी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद भोंग, तसेच महाविद्यालयीन प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचाऱ्यांनी रणसिंग यांचे अभिनंदन केले.

# कात्रज-कोंढवा रोडवर शिक्षिकेचा कंटेनरखाली येऊन दुर्दैवी मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

मागील अनेक वर्षांपासून रखडलेल्या आणि अद्यापही अपूर्ण असलेल्या कात्रज-कोंढवा रस्त्याने सोमवारी आणखी एक निष्पाप बळी घेतला. इस्कॉन मंदिराजवळील धोकादायक आणि काम सुरू असलेल्या या रस्त्यावर दुचाकी व कंटेनरचा भीषण अपघात होऊन शिक्षिकेचा जागीच मृत्यू झाला. पतीचे १५ वर्षांपूर्वी निधन झालेल्या या महिलेच्या अपघाती मृत्यूमुळे तिची मुलगी पूर्णपणे पोरकी झाली आहे.





खडीमशीन चौकाकडून कात्रजच्या दिशेने दुचाकीवरून जात असताना सोमवारी सकाळी साडेसातच्या सुमारास मोठ्या कंटेनरच्या चाकाखाली महिला सापडली. अपूर्ण रस्ता, अरुंद मार्ग, कामामुळे निर्माण झालेले डायव्हर्शन आणि प्रचंड वाहतूक कोंडी यामुळे अपघात अधिक गंभीर झाला. या घटनेत रमा कपाडे (वय ५३, रा. कात्रज-कोंढवा रोड) या गंभीर जखमी झाल्या. मात्र, वाहतूक कोंडीमुळे वेळेत उपचार न मिळाल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती प्रथमदर्शनी समोर आली आहे.

रमा कपाडे या जे.एस.पी.एम. संस्थेमध्ये शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. त्यांच्या पतीचे १५ वर्षांपूर्वी निधन झाले होते. त्या आई आणि मुलीसोबत राहत होत्या. आईचा आधार अचानक हरपल्याने आता मुलीच्या उदरनिर्वाहाचा आणि शिक्षणाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, कात्रज-कोंढवा या अवघ्या साडेतीन किलोमीटरच्या रस्त्यावर गेल्या साडेचार वर्षांत ५५ हून अधिक अपघात झाले असून त्यात तब्बल २५ जणांचा मृत्यू झाला आहे. रस्त्याचे काम वर्षानुवर्षे सुरू असूनही अद्याप पूर्ण न झाल्याने हा मार्ग 'अपघातप्रवण' ठरत आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आणखी किती बळी जाणार, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्याला माळेगाव पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**माळेगाव । प्रतिनिधी**

माळेगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची गंभीर घटना घडली होती. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. स्वप्निल उर्फ सोपान विश्वंबर पवार (वय २१ वर्षे, रा. मांडवजाळी, ता. जि. बीड) असं अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे.

याबाबत अल्पवयीन मुलीच्या आईने तक्रार दाखल केली आहे. त्यावरून पोलिसांनी ३०५/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७(२) प्रमाणे ०४ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माळेगाव पोलीस स्टेशन हद्दीत अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन लोखंडे यांनी तातडीने तपास पथक तयार केले.




या पथकात पोलीस उपनिरीक्षक तुषार भोर, सहाय्यक फौजदार संजय मोहिते, पोलीस कॉन्स्टेबल अमोल वाघमारे व जयसिंग कचरे यांची नेमणूक करण्यात आली. तांत्रिक विश्लेषणातून आरोपी अल्पवयीन मुलीस बीड येथे घेऊन गेला असल्याचे स्पष्ट झाल्याने तपास पथक तात्काळ बीडला रवाना झाले. तेथे आरोपी व अल्पवयीन मुलीस ताब्यात घेण्यात आले. तपासात आरोपी स्वप्निल पवार याने अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे गुन्ह्यात बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायदा (झजउडज -लीं) अंतर्गत कलम वाढ करून आरोपीला अटक करण्यात आली. आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला १६ डिसेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. अल्पवयीन मुलीस तिच्या आईच्या ताब्यात सुखरूप सुपूर्त करण्यात आले. या कारवाईमुळे परिसरात गुन्हेगारांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांच्या तातडीच्या कारवाईचे कौतुक होत आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक तुषार भोर करीत असल्याची माहिती प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन लोखंडे यांनी दिली.

# एकतर्फी प्रेमातून कबड्डी खेळाडू मुलीचा खून करणाऱ्याला जन्मठेप

**पुणे । प्रतिनिधी**

बिबवेवाडी येथील यश लॉन्स येथे १५ वर्षीय राष्ट्रीय कबड्डी खेळाडू मुलीवर एकतर्फी प्रेमातून चाकूने व कोयत्याने बावीस वार करून तिचा निर्घृण खून करणा-याला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी हा निकाल दिला. घटनेनंतर चार वर्षांनी मुलीच्या कुटुंबियांना न्याय मिळाला.



शुभम उर्फ ऋषिकेश बाजीराव भागवत असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. ही घटना १२ ऑक्टोबर २०२१ रोजी घडली होती. आरोपीने मुलीचा गळा चिरून तिचं धड शरीरापासून वेगळं करून निर्घृण खून केला होता. या प्रकरणात विशेष सरकारी वकील हेमंत झंजाड यांनी अशा क्रूर व्यक्तीला कोणतीही दयामाया न दाखविता आरोपीला फाशीची शिक्षा योग्य राहील व ही शिक्षा संपूर्ण समाजाला एक वेगळा आदर्श घालून देईल. त्यामुळे आरोपीला फाशी द्यावी अशी मागणी त्यांनी केली होती. साक्षीदारांनी दिलेली साक्ष व उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांच्या निकालाचे न्यायनिवाडे सरकारी पक्षाच्या वतीने न्यायालय सादर करण्यात आले होते. न्यायालयाने सरकारी पक्ष आणि बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकून घेतला. हा खटला दुर्मिळातील दुर्मिळ प्रकरणांच्या श्रेणीत येईल असे मानणे कठीण होईल. पण सरकारी पक्षाच्या म्हणण्यानुसार हा गुन्हा क्रूर होता. शवविच्छेदन अहवालानुसार मुलीच्या मृतदेहावर २५ छेदलेल्या जखमा आढळल्या. भारतीय दंड विधानाच्या कलम ३०२ अंतर्गत आरोपी दोषी आढळला आहे. या गुन्ह्यासाठी मृत्युदंड किंवा जन्मठेपेची शिक्षा अशा दोनच तरतुदी आहेत. जन्मठेप हा नियम आहे आणि मृत्युदंड हा अपवाद आहे. मृत्युदंडाची शिक्षा देऊन हे अपवादात्मक प्रकरण म्हणून घोषित होणे हे माझ्या न्यायिक मनाला पटत नाही. त्यामुळे जन्मठेपेची शिक्षा ही आरोपीसाठी योग्य शिक्षा आहे असे निरीक्षण नोंदवित न्यायालयाने आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

# तळेगाव ढमढेरेतून देवदर्शनाला गेलेल्या युवकांचा दुर्दैवी मृत्यू

**शिरूर । प्रतिनिधी**

तळेगाव ढमढेरे (ता. शिरुर) येथून नारायणपूर येथे देवदर्शनासाठी गेलेली युवकांच्या दुचाकीला टेम्पोची धडक बसून झालेल्या अपघातात समीर संभाजी ढमढेरे व सार्थक विजय ढमढेरे या दोघा युवकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

तळेगाव ढमढेरे येथील दिपक ढमढेरे, समीर ढमढेरे व सार्थक ढमढेरे हे तिघे युवक दुचाकीहून ११ डिसेंबर रोजी नारायणपूर येथे देवदर्शनासाठी गेलेले होते, देवदर्शन हून पुन्हा घरी येत असताना शिंदवणे घाटात समोरून भरधाव वेगाने आलेल्या टेम्पोची दुचाकीला समोरून धडक बसून अपघात होऊन समीर ढमढेरे व सार्थक ढमढेरे हे दोघे गंभीर तर दिपक ढमढेरे किरकोळ जखमी झाले. दरम्यान टेम्पो चालक टेम्पो सोडून पळून गेला, यावेळी नागरिकांनी जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असताना उपचार सुरु असताना आज १६ डिसेंबर रोजी सकाळच्या सुमारास समीर ढमढेरे व सार्थक ढमढेरे यांचा मृत्यू झाला असून याबाबत दिपक ढमढेरे यांनी उरुळीकांचन पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी एम एच १२ एल टी ०७४६ या टेम्पोवरील अज्ञात चालकावर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करत आहे.

# एका दिवसात २२० कोटी वसूल! लोकअदालतीत केला रेकॉर्ड; जिल्ह्यातील ४३ हजार दावे निकाली

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरासह जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये शनिवारी (दि. १३) आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये पुणे जिल्ह्यातील ४३ हजार १०७ प्रकरणे तडजोडीअंती निकाली काढण्यात आली. या प्रकरणांमधून तब्बल २२० कोटी ४७ लाख ७५ हजार ५७१ रुपयांचे तडजोड शूल्क वसुल केले आहे. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पुणे जिल्ह्याचे प्रमुख न्यायाधीश, पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष महेंद्र महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये शनिवारी (दि. १३) राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन केले होते. लोक अदालतमध्ये प्रलंबित आणि दाखलपूर्व अशा दोन प्रकरची प्रकरणे ठेवण्यात आली होती. प्रलंबित



प्रकरणांमध्ये न्यायलयात दाखल असलेल्या प्रकरणांचा समावेश असतो. ही प्रकरणे वेगवेगळ्या कारणास्तव वर्षानुवर्षे सुरूच असतात. अशी सुमारे ५० हजार ७३४ प्रलंबित दावे लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात आले होते. या दाव्यांमधील ८ हजार ५४ प्रकरणे अदालतीत एका दिवसात निकाली काढण्यात आली. तसेच १ लाख ७२ हजार ८०५ दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली होती. ही प्रकरणे दाखल न करून घेता त्यावर न्यायलयाच्या बाहेर समोरासमोर बोलवून लोक अदालतीमध्ये तोडगा काढण्यात येत होता. या दाखलपूर्व प्रकरणंमधील सुमारे ३५ हजार ५३ प्रकरणे निकाली निघाली काढण्यात आली. अशा दोन प्रकरांमधील एकूण ४३ हजार १०७ प्रकरणे तडजोडीअंती निकाली काढण्यात आल्याची माहिती पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव रेवती देशपांडे यांनी दिली.

एका दिवसात २२० कोटी वसूल! लोकअदालतीत केला रेकॉर्ड; जिल्ह्यातील ४३ हजार दावे निकाली

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरासह जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये शनिवारी (दि. १३) आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये पुणे जिल्ह्यातील ४३ हजार १०७ प्रकरणे तडजोडीअंती निकाली काढण्यात आली. या प्रकरणांमधून तब्बल २२० कोटी ४७ लाख ७५ हजार ५७१ रुपयांचे तडजोड शूल्क वसुल केले आहे.

नवी दिल्ली येथील राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पुणे जिल्ह्याचे प्रमुख न्यायाधीश, पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष महेंद्र महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये शनिवारी (दि. १३) राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन केले होते. लोक अदालतमध्ये प्रलंबित आणि दाखलपूर्व अशा दोन प्रकरची प्रकरणे ठेवण्यात आली होती. प्रलंबित प्रकरणांमध्ये न्यायलयात दाखल असलेल्या प्रकरणांचा समावेश असतो. ही प्रकरणे वेगवेगळ्या कारणास्तव वर्षानुवर्षे सुरूच असतात. अशी सुमारे ५० हजार ७३४ प्रलंबित दावे लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात आले होते. या दाव्यांमधील ८ हजार ५४ प्रकरणे अदालतीत एका दिवसात निकाली काढण्यात आली. तसेच १ लाख ७२ हजार ८०५ दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली होती. ही प्रकरणे दाखल न करून घेता त्यावर न्यायलयाच्या बाहेर समोरासमोर बोलवून लोक अदालतीमध्ये तोडगा काढण्यात येत होता. या दाखलपूर्व प्रकरणंमधील सुमारे ३५ हजार ५३ प्रकरणे निकाली निघाली काढण्यात आली. अशा दोन प्रकरांमधील एकूण ४३ हजार १०७ प्रकरणे तडजोडीअंती निकाली काढण्यात आल्याची माहिती पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव रेवती देशपांडे यांनी दिली.

# कोहिनुर ग्रुपतर्फे 'पुस्तक' प्रतिकृतीतून 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' करत वाचन संस्कृतीचा जागर

**पुणे । प्रतिनिधी**

खडकी शिक्षण संस्थेच्या टिकाराम जगन्नाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात (स्वायत्त), खडकी-पुणे येथे पुणे पुस्तक महोत्सवाच्या अंतर्गत वाचनसंस्कृतीला जागतिक व्यासपीठावर नेणारा अभूतपूर्व आणि विश्वविक्रमी उपक्रम कोहिनुर ग्रुपतर्फे साकारण्यात आला. शांतता पुणेकर वाचत आहेत या संकल्पनेवर आधारित, वाचन चळवळीत सहभागी झालेल्या वाचकांचे पुस्तक वाचतानाचे छायाचित्र वापरून मराठी देवनागरी लिपीत 'पुस्तक' या शब्दाची भव्य प्रतिकृती उभारण्यात आली.



या अभिनव उपक्रमासाठी तब्बल १७,००१ वाचकांच्या छायाचित्रांचा वापर करण्यात आला असून, या उपक्रमाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये अधिकृत नोंद झाली आहे. त्यामुळे पुणे पुस्तक महोत्सव, कोहिनुर ग्रुपने, खडकी शिक्षण संस्था आणि टी. जे. महाविद्यालयाच्या प्रांगणात ऐतिहासिक विक्रम नोंदवला आहे. या विश्वविक्रमी उपक्रमामागील गिनीज वर्ल्ड रेकॉर्डची संकल्पना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे आणि पुणे पुस्तक महोत्सवाचे अध्यक्ष राजेश पांडे, कोहिनुर ग्रुपचे सर्वेसर्वा कृष्णकुमार गोयल यांची असून, त्यांच्या मार्गदर्शनामुळे ही कल्पना प्रत्यक्षात साकार झाली. याप्रसंगी एनपीटीचे अध्यक्ष मिलिंद मराठे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, पुणे पुस्तक महोत्सव आणि कोहिनुर ग्रुप व खडकी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून उभा राहिलेला हा उपक्रम म्हणजे वाचनसंस्कृतीचे वैचारिक आंदोलन आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमुळे केवळ विक्रम नोंदला गेला नाही, तर वाचनाचे सामाजिक मूल्य अधिक दृढ झाले असून, संस्थेच्या शैक्षणिक वैभवात मोलाची भर पडली आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी नमूद केले की, वाचन ही केवळ अभ्यासाची प्रक्रिया नसून समाजमन घडवणारी शक्ती आहे. 'पुस्तक' या शब्दाची प्रतिकृती ही केवळ कलाकृती नसून ज्ञान, शांतता आणि विवेक यांची सामूहिक अभिव्यक्ती आहे. विद्यार्थ्यांना व समाजाला वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी असे उपक्रम दिशादर्शक ठरतात.

पुणे पुस्तक महोत्सवाचे अध्यक्ष राजेश पांडे यांनी सांगितले की, पुण्याची समृद्ध वाचनपरंपरा जागतिक स्तरावर नेण्याचे कार्य या उपक्रमातून झाले आहे. १७,००१ वाचकांच्या सहभागातून उभा राहिलेला हा विक्रम म्हणजे वाचनचळवळीचा उत्सव असून, कोहिनुर ग्रुप व टी. जे. महाविद्यालयाने पुणे पुस्तक महोत्सवाच्या उद्दिष्टांना बळ दिले आहे. खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व कोहिनुर ग्रुपचे सर्वेसर्वा कृष्णकुमार गोयल यांनी अध्यक्षीय मनोगतात प्रतिपादन केले की, वाचन ही केवळ शैक्षणिक गरज नसून समाजात शांतता, संस्कार आणि वैचारिक प्रगल्भता निर्माण करणारी चळवळ आहे. आज कोहिनुर ग्रुपने खडकी शिक्षण संस्था व टी. जे. महाविद्यालयाच्या प्रांगणात पुणे पुस्तक महोत्सवात गिनीज वर्ल्ड रेकॉर्डद्वारे ही चळवळ जागतिक पातळीवर नेली, याचा कोहिनुर ग्रुपला अभिमान आहे. या कार्यक्रमास पुणे पुस्तक महोत्सवाचे अध्यक्ष राजेश पांडे, एनपीटीचे अध्यक्ष मिलिंद मराठे, प्रसेनजित फडणवीस, बागेश्री मंठाळकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे रासेयो संचालक गणेश भामे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे, संस्थेचे सचिव आनंद छाजेड, संस्था पदाधिकारी काशिनाथ देवधर, रमेश अवस्थे, ड. अजय सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संस्थेच्या सर्व विभागांचे प्रमुख, प्राध्यापकवृंद, प्राध्यापकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार ठरले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बागेश्री मंठाळकर यांनी केले, आभार सचिव आनंद छाजेड यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. स्वामीराज भिसे यांनी केले. या विश्वविक्रमी उपक्रमाने वाचनसंस्कृतीचा जागर करत पुण्याच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक परंपरेला जागतिक ओळख मिळवून दिली, असे मत सर्व स्तरांतून व्यक्त करण्यात आले.